बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के



दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | शनिवार,दि.१२ एप्रिल २०२५ |वर्षे४थे| अंक२४०वा|पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के




## खा. बजरंग सोनवणे पहिले हे सांगा की

# रेल्वे कधी धावेल!!

### बीड रेल्वे संदर्भात तीन तास मॅरेथॉन बैठक ◆ खा.बजरंग सोनवणे यांनी केले समाधान व्यक्त ◆ बीड-नगर-मुंबई रेल्वे सुरु करण्याचे दिले निर्देश ! ◆ रेल्वे कामाची गती जराही मंदावू देऊ नका

**या कामांचे मागविले प्रस्ताव**

आष्टी तालुक्यातील सोलापूरवाडी, कडा तसेच पाटोदा तालुक्यातील गांधनवाडी, कारेगाव आणि शिरुर तालुक्यातील गोमळवाडा, विघनवाडी, हिवरसिंगा, घुगेवाडी/बरगवाडी आणि बीड तालुक्यामधे नवगण राजुरी, च-हाटा, धानोरा रोड या सर्व ठिकाणी रेल ओव्हर ब्रिज व बीड शहरालगत ढोलेवस्ती येथे रेल अंडरपास बांधण्याचे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना दिल्या. मुंबई येथील मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर यांचेशी प्रस्ताव व निधी मंजुरीबाबत चर्चा केली.

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम या पूर्वीच्या बैठकांमधे निश्चित करुन देण्यात आलेल्या वेळेत होत असल्याबद्दल समाधान व्यक्त करत असतानाच कामाची गती मंदावू देऊ नका. बीड ते परळी रेलमार्गासाठी बाधित होत असलेल्या शेतकऱ्यांना भुसंपादनाचा मावेजा देताना काटकसर करु नका. भुसंपादनाची उर्वरित प्रकरणे तातडीने मार्गी लावा. विद्युतीकरणाच्या कामात येत असलेले अडथळ्यांवर मार्ग काढीत असताना रेल्वे क्रॉसिंगची काही कामे अर्धवट असून ती तातडीने पुर्ण करा. रेल्वेमार्गास विद्युत जोडणीच्या कामाला गती द्या, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी केल्या.दि.११



एप्रील रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११ वाजता रेल्वे विभागाच्या बैठकीला सुरूवात झाली. बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मध्य रेल्वेचे उपमुख्य अभियंता लोळगे तसेच पाटोदा, बीड, माजलगाव महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी, भूसंपादन अधिकारी, महावितरण विभागाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी, आहिल्यानगर आणि नांदेड रेल्वेचे मुकुंद नाईक, ▸▸ पान २ वर

धाराशिव-बीड-छ. संभाजीनगर या नवीन रेल्वेमार्गाच्या सर्व्हेक्षणास गती देण्याबाबत संबंधित अधिकारी यांना सूचना दिल्या.बार्शीनाका (इमामपूर) येथे अतिरिक्त रेल्वे थांबा देणे, नगर-बीड-परळी रेल मार्गावरील सर्व प्रमुख स्थानकाना लागणारी वीज उपलब्ध करणेसाठी स्थानकांवर सोलार उर्जा निर्मिती प्रकल्प तयार करावेत. यासाठी आवश्यक निधीच्या मागणीसह स्वतंत्र प्रस्ताव जनरल मॅनेजर यांचे कार्यालयास सादर करावेत अशा सूचना देण्यात आल्या.

---

## पौळाचीवाडी येथे उपोषण

**दुर्लक्ष:**अधिकारी आंदोलनाकडे फिरकले सुध्दा नाही



पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:तालुक्यातील पौळाचीवाडी येथे पाणी टँकर सुरु करावे यासह विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते शरद जाधव हे गावातील मंदिरात बुधवारपासून उपोषणाला बसले आहेत. दरम्यान शुक्रवारी तिसऱ्या दिवशी देखील प्रशासनाने या आंदोलनाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले. तीन दिवसांत कोणताही प्रशासकीय अधिकारी या आंदोलनस्थळी फिरायला नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान शरद जाधव यांच्या या आंदोलनाला ग्रामस्थांनी पाठिंबा दर्शविला आहे.

पौळाचीवाडी येथे मागील महिण्यापासून तिव्र पाणी टंचाई आहे. याबाबत गटविकास अधिकारी तसेच तहसीलदार यांना निवेदन देऊन देखील दखल घेतली नाही. परिणामी गावात सध्या पिण्याच्या पाण्याची नागरिकांना भ्रांत असून पाण्याच्या शोधात नागरिकांना पायपीट करावी लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात संताप व्यक्त होत असून पाणी टंचाईमुळे गावात तात्काळ पाणी टँकर सुरू करण्यात यावे, गावातील अमृता नदीवरील बंधाऱ्यातुन गाळ ऊपसा करण्यात यावा, संजय गांधी यासह श्रावण बाळ योजनेत पौळाचीवाडी गावातील गोरगरीब लोक घ्यावेत, पौळाचीवाडी ते तरडगव्हान रस्ता डांबरीकरण करण्यात यावा, खळेगाव ते बंगाली पिंपळा रस्ता व

खळेगाव ते ऊमापुर रस्ता डांबरीकरण ▸▸ पान २ वर

---

## चिंचोली माळी अवैध दारु विक्री?

**मागणी:**पोलीस अधीक्षकांनी लक्ष द्यावे

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील चिंचोली माळी येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक तसेच शासकीय कार्यालयांच्या समोर सुमार अवैध दारू विक्री करण्यात येत आहे तरी सुद्धा चिंचोली माळी येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही केली जात नाही तरी अशा अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावाल्यांना वरद हस्त कुनाच आहे पोलीस प्रशासन कार्यवाही करत का नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे



नेमका अवैध दारू विक्री करण्यासाठी चिंचोली माळीतील धाब्यावाल्यांना अर्शिवाद कुनाचा आहे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे तसेच काही धाबे शासकीय कार्यालयांच्या समोरच आहेत तरी सुद्धा प्रशासन गप्प का आहे का शासकीय कार्यालयांच्या समोर दीवसा ढवळ्या अवैध दारू विक्री चिंचोली माळी येथे होत आहे मग काय प्रशासनाने अवैध दारू विक्री करण्यासाठी परवानगी दिली आहे का कारण अशा प्रश्न उपस्थित होतो आहे तसेच चिंचोली माळी येथे दारू पिऊन अनुचित प्रकार घडू लागले आहेत असे प्रकार फक्त दारु पिऊन होऊ लागले आहेत तसेच गावातील अखंड हरिनाम सप्ताह दोन दिवसांनी सुरू होत आहे तरी ▸▸ पान २ वर

---

## रेल्वे स्थानक धानोरा रोडलाच!

**संभाजी सुर्वे :**रेल्वे स्थानक स्थलांतरासाठी व्यर्थ शक्ती लावु नये

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा असलेला रेल्वेचा प्रश्न मार्गी लागला आणि रेल्वे स्थानकचे काम हे धानोरा रोडला झाले आहे. त्या साठी लागणारी जमीन शासनाकडून अधिग्रहण देखील करण्यात आली आहे. आणि त्या ठिकाणी रेल्वे स्थानक उभे राहिले आहे. धानोरा रोडला रेल्वे स्थानक व्हावे या साठी भाजपा नेते संभाजी सुर्वे यांनी अनेक आंदोलन केली. शहरातील नागरिकांची स्वाक्षरी मोहीम उभा



केली त्या मध्ये शहरातून त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. त्यांच्या या मागणीला यश आले आहे. परंतु आज देखील काही सामाजिक संघटना या रेल्वे स्थानका बरोबर रेल्वे कामात देखील खोडा ▸▸ पान २ वर

### खा. सोनवणे म्हणजे पोस्टमन

बीड रेल्वे संदर्भात बीड जिल्ह्यातील खासदार बजरंग सोनवणे उगाचच सरकारने काही निर्णय घेतला की तो माझ्यामुळेच झाला आहे असे दाखवत आयत्या पिठावर रेघोट्या ओढण्याचे काम करत आहेत. त्यांनी देखील जिल्ह्यातील अनेक प्रश्नावर लक्ष दिले पाहिजे. ते खासदार आहेत पोस्टमन नाहीत हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. त्यांच्या मुळे बीड जिल्ह्यात आणखी एक वीट सुद्धा आली नाही हे या जिल्ह्यातील हुशार लोकांना चांगलेच माहिती आहे हे त्यांनी विसरू नये असे देखील मत संभाजी सुर्वे यांनी व्यक्त केले आहे.

---

## शेतकरी भवनाचा प्रश्न मार्गी

**दिलासा:**उभारणीस १.५२ कोटी रुपये निधी मंजूर

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई येथे नवीन शेतकरी भवन उभारण्याच्या १ कोटी ५२ लाख ६८ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास सहकार विभागाने आज प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये सुसज्ज असे शेतकरी भवन उभारण्यात यावे, यासाठी सभापती तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड राजेश्वर आबा चव्हाण यांच्या सह सर्व संचालक मंडळाच्या वतीने धनंजय मुंडे यांना विनंती ▸▸ पान २ वर

---

## महात्मा फुले सामाजिक क्रांतीचे प्रणेते

**कार्यक्रम:**जोतिबा फुलेंची जयंती निमित्ताने अभिवादन



पुण्यभूमी प्रतिनिधी

अंबाजोगाई:सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालक मंत्री अजित दादा पवार साहेब, तसेच महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा व महीला प्रदेश अध्यक्ष सौ रुपाली ताई चाकणकर, तसेच धनंजयजी मुंडे ▸▸ पान २ वर

---

**प्रा.मुंडे** | **परळीत महात्मा फुले,डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती**

## विद्यार्थ्यांसह पालकांचेही प्रबोधन महत्वाचे

पुण्यभूमीप्रतिनिधी

परळी:आजची परिस्थिती पाहता विद्यार्थ्यांसह पालकांचे प्रबोधन करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राचे ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे यांनी केले.ते क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त परळी येथे आयोजित विद्यार्थी प्रबोधन मेळाव्याचे उद्घाटन प्रसंगी बोलताना केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक आणि संपादक रानबा गायकवाड होते, तर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विश्वनाथ गायकवाड, माधव ताटे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते उत्तम माने, वंचित बहुजन आघाडीचे मिलिंद घाडगे, विचारवंत अजय गंडले, दत्ता सावंत,




लेखक-दिग्दर्शक डॉ. सिद्धार्थ तायडे, महेंद्र रोडे, फुले-आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे, मूफ्टा जिल्हाध्यक्ष भैय्या आदोडे, श्रीकांत पाथरकर आणि विचारवंत प्रा. दयानंद झिंझुर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात थोर समाजसुधारक महात्मा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. मिलिया विद्यालयातील विद्यार्थी सय्यद साद अब्दुल गनी याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वेशभूषा साकारल्याने तो कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला. याप्रसंगी माधव ताटे, मिलिंद घाडगे ,उत्तम माने ,विश्वनाथ गायकवाड, प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे, अजय गंडले, प्रा. दयानंद झिंजुर्डे, भैय्यासाहेब आदोडे यांनी आपले विचार मांडले.या प्रबोधन मेळाव्यास पत्रकार धनंजय आरबुने, संपादक नितीन ढाकणे, सिद्धेश्वर इंगोले, ▸▸ पान २ वर

---

## देशासह राज्यात उष्णतेची लाट

**हवामान:** शाळांच्या वेळेत बदल

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:देशासह राज्यात उन्हाचा कडाका चांगलाच वाढला आहे. अनेक राज्यांमध्ये हवामान विभागाकडून हीट व्हेव अर्थात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. वाढत्या उन्हामुळे लोकांना घराच्या बाहेर पडणं देखील अवघड झालं आहे. वाढत्या उष्णतेचा मोठा फटका हा विद्यार्थ्यांना बसत असल्याचं पाहायला मिळत आहे, त्यामुळे आता अनेक राज्यांमध्ये शाळांच्या वेळापत्रकात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाकडून (खचऊ) आठ राज्यांना उष्णतेचा ऑरेंज अलर्ट दिला आहे, तर काही राज्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.मध्य प्रदेशच्या शिक्षण विभागानं वाढती उष्णता आणि हवामान खात्याच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर



शाळेच्या वेळापत्राक बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. भोपाळमधील सर्व शाळांना दुपारी बारापर्यंतच शाळा सुरू ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे. ओडिशामध्ये देखील शाळेच्या वेळेत बदल करण्यात आला आहे, राज्यात आलेली उष्णतेची लाट लक्षात घेता येतील शाळा फक्त सकाळच्या सत्रातच भरवल्या जाव्यात असा आदेश तेथील सरकारने दिला आहे. त्यामुळे ओडिशामध्ये आता शाळा या फक्त सकाळच्या सत्रात साते ते नऊ या वेळेतच सुरू ▸▸ पान २ वर

## दुखण्यावर तोडगा कधी?

राज्य सरकारमध्ये कार्यरत असणाऱ्या मंत्रालयीन तसेच विविध शासकीय आस्थापनेचे कर्मचारी, अगदी स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी वेतनाबाबत समाधानी असतात, त्यांना नियमित वेतनवाढ होत असते. वाढत्या महागाईच्या तुलनेत त्यांच्या वेतनवाढीचा ग्राफही उंचावत असतो. हे मासिक वेतन त्यांना नियमितपणे प्राप्तही होत असते. वर्षभर काम केल्यावर मिळणारा बोनस, सानुग्रह अनुदानही समाधान करणारे, दिलासा देणारे असते. राज्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत बोलावयाचे झाल्यास सर्वच बाबतीत 'ओला दुष्काळ' असताना याला एसटी कामगारांच्या समस्येचे ग्रहण लागावे, इतपत आजमितीस भयावह चित्र निर्माण झालेले आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या पाचवीच्या दिवशी सटवाईने कदाचित आर्थिक ससेहोलपटचे भाकीत लिहिलेले असावे. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून एसटी कर्मचारी व अधिकारी आर्थिक समस्येच्या चक्रव्यूहामध्ये भरडले जात आहेत. अनेकदा आंदोलने करूनही, निदर्शने करूनही त्यांच्या समस्यांचे आजतागायत निवारण झालेले नाही व सध्याचे चित्र पाहता नजीकच्या काळातही यात फारसा बदल होईल, असे वाटतही नाही. एप्रिल महिन्याची १० तारीख लोटलेली असताना शासकीय तसेच खासगी आस्थापनेतील कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन मिळालेले आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्याच्या १० तारखेला एकूण वेतनाच्या जेमतेम अर्धाच पगार खात्यामध्ये जमा झाला आहे. उर्वरित पगार लवकरच खात्यात जमा होईल, असे उत्तर त्यांना शासनाकडून देण्यात आलेले आहे. मुळातच महिना भरल्यावर कर्मचारी आतुरतेने वेतनाची वाट पाहत असतात. मागील महिन्यात केलेल्या परिश्रमाच्या मोबदल्यावर त्यांची या महिन्याच्या आर्थिक समीकरणाची जुळवाजुळव सुरू असते. त्यातच आपल्या बँक खात्यात केवळ अर्धाच पगार जमा झाल्याचे समजल्यावर त्या कर्मचाऱ्यांची मानसिक अवस्था काय होत असेल, याची कल्पनादेखील करणे अवघड आहे. एसटी कर्मचाऱ्यांनी वेतनवाढ व अन्य समस्यांसाठी काही वर्षांपूर्वी प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडले होते, महिन्याहून अधिक कालावधी लोटला तरी एसटीच्या बसेस आगाराबाहेर पडल्या नव्हत्या. रस्त्यावर एसटीची एकही बस धावताना पाहावयास मिळाली नव्हती. आज प्रवासी सुविधेमध्ये अनेक बदल होत असले, खासगी प्रवासी सुविधांचा आलेख उंचावत असला तरी राज्यात एसटीच्या प्रवासी सेवेचे कोणीही बरोबरी करू शकत नाही. एसटीच्या प्रवासी सुविधेमुळेच आज खऱ्या अर्थाने प्रवासी तिकिटांचे दर आवाक्यात आहेत अन्यथा खासगी प्रवासी सुविधा देणाऱ्यांनी आर्थिक लुटमार बेमालूमपणे केली असती. या आंदोलन काळात महाराष्ट्रातील जनतेचे अतोनात हाल झाले. खासगी प्रवासी सुविधेला प्रशासनाकडून त्या काळात अल्प कालावधीकरिता संरक्षण देण्यात आले असले तरी त्यांच्याही सेवा पुरविण्याला अखेर मर्यादा पडल्या. एसटीची प्रवासी सुविधा आर्थिक नफ्याची सांगड न घालता प्रवाशांच्या समाधानाकरिता व त्यांना गावागावात प्रवासी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एसटीची बस धावत आहेत. एसटीचे चालक वाहकांना रात्रीच्या मुक्कामाच्या ठिकाणी सुसज्ज शयनगृहे उपलब्ध नसतात. त्यांना मिळेल त्या जागेवर रात्र काढावी लागते. अनेकदा एसटी बसमध्ये रात्रीची झोप घ्यावी लागत असल्याचे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पाहावयास मिळत आहे. असे असतानाही एसटी कर्मचारी, अधिकाऱ्यांची कमी वेतन, वेतनास विलंब ही आर्थिक ससेहोलपट कायम असावी, ही त्या कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या नशिबाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.एसटी कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा काढताना न्यायालयात राज्य सरकारने एसटी कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या वेतनाची जबाबदारी स्वीकारली होती; परंतु त्या जबाबदारीचे पालन करण्यास राज्य सरकारकडून प्रत्येक महिन्याला चालढकल केली जात असल्याने आर्थिक संकटाच्या चक्रव्यूहामध्ये एसटीचे कर्मचारी, अधिकारी भरडले जात आहेत. दर महिन्याला एसटी महामंडळाला राज्य सरकारकडून वेळेवर तोही माफक प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जात नाही. आजही एसटी महामंडळाचे दररोजचे प्रवासी उत्पन्न काही लाखांच्या घरात आहे. त्या त्या काळातील सत्ताधारी राजकीय घटकांनी प्रवाशांना सुविधा देण्याच्या नावाखाली एसटीच्या उत्पन्नात घट आणली आहे. मात्र ही घट भरून काढण्यासाठी एसटी महामंडळाला निधी उपलब्ध करून देणे, ही त्या त्या सत्ताधाऱ्यांची जबाबदारी असते. पण हीच जबाबदारी राज्य सरकारांनी न स्वीकारल्याने एसटी महामंडळ, एसटी कर्मचारी व अधिकारी आर्थिक चक्रव्यूहामध्ये फसत गेले व त्यामुळेच आज महिन्याच्या दहा तारखेला अर्ध्या वेतनाकडे पाहण्याची दुर्दैवी वेळ एसटीच्या कर्मचारी, अधिकाऱ्यांवर आलेली आहे. महिलांना एसटी प्रवास केवळ अर्ध्या तिकिटामध्ये उपलब्ध करून दिलेला आहे. यामुळे महिला प्रवासीरूपी मतदार राज्य सरकारमधील सत्ताधाऱ्यांवर खूश झालेला आहे. तथापि या अर्ध्या तिकिटामुळे एसटी महामंडळाचे दर महिन्याला किती लाखांचे नुकसान होणार आहे, याचा विचार ना राज्य सरकारने कधी केला आहे, ना अर्ध्या तिकिटामध्ये प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांनी केला आहे. याशिवाय ७५ वर्षे वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास राज्य सरकारने उपलब्ध करून दिलेला आहे. पण या मोफत प्रवासासाठी राज्य सरकारने एसटीला आर्थिक मदत करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक होते; परंतु येथे राज्य सरकारने उदासीनतेचे धोरण अवलंबत काढता पाय घेण्याची भूमिका घेतलेली आहे. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'साठी राज्य सरकारने दर महिन्याला करोडो रुपयांचा निधी उपलब्ध होत आहे. दर महिन्याला लाडक्या बहिणींच्या खात्यामध्ये न मागताही १५०० हजार रुपये जमा होत आहेत. निवडणूक काळात तर लाडक्या बहिणींच्या खात्यात २१०० रुपये जमा करण्याचे आश्वासनरूपी घोषणाही करण्यात आली होती.

# कोंढवा येथे राम जन्मोत्सव साजरा

## आध्यात्मिक:पवन बन्सल परिवारातर्फे उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी



पुणे:कोंढवा खुर्दच्या एनआयबीएम रोडवरील संकट मोचन महादेव मंदिर परिसरातील राम मंदिरातै रविवार ६ एप्रिल २०२५ रोजी श्रीराम नवमी व जन्मोत्सवाचा कार्यक्रम हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. या निमित्ताने संपूर्ण मंदिर परिसर राममय झाल्याचे पहायला मिळाले. या उपक्रमासाठी श्रीराम सेवक पवन बन्सल व परिवारातर्फे पुढाकार घेण्यात आला, तसेच माजी नगरसेवक तानाजी लोणकर यांचे या सोहळ्याला मोठे सहकार्य लाभले.

रामनवनमी निमित्ताने मंदिर परिसरात भव्य अशी सजावट करण्यात आली होती. दुपारी ठीक १२ वाजता रामजन्मोत्सव सोहळ्याला सुरवात झाली. या वेळी हजारो भाविकांच्या उपस्थितीत प्रभू श्रीराम व सीता माता यांची मनोभावे पूजा व आरती करण्यात आली. तत्पूर्वी मंदिर परिसरात रामनाम व सीतानामाचा जप तसेच भजन कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाला पवन बन्सल यांच्यासह पुणे अग्रवाल समाज के अध्यक्ष ईश्वर गोयल, भवन बन्सल, सुनीता बन्सल, अनिता रिषभ बन्सल, असीम बन्सल, जयभगवान गोयल, नरेंद्र गोयल, गुंजन नवल, संजय बन्सल, जीतेश बन्सल, संजय बन्सल, जीतेश अग्रवाल, शैलेश खंडेलवाल, योगेश जैन, पवन चमाडिया, सागर अग्रवाल रमेश अग्रवाल यांच्यासह मोठ्या संख्येने कोंढवा परिसर व शहरातील रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमासंदर्भात बोलताना पवन बन्सल म्हणाले की, आज या ठिकाणी राम नवमीनिमित्ताने हजारोंच्या संख्येत रामभक्तांनी येऊन प्रभू श्रीराम व माता सीतेचे दर्शन घेतले. या शिवाय या ठिकाणी रामायण मन का पाठ, महाअभिषेक, महाआरती करण्यात आली. त्यानंतर भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.बन्सल यांनी सांगितले की, ब्रदरहूडच्या वतीने राम नवमी निमित्ताने सोमवार ७ एप्रिल रोजी अल्पबचत भवन येथे संध्या काळी ५ वाजता भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सुप्रसिद्ध गायक आदित्य गोयल आणि रितु पांचाल रामाची भजने सादर करणार आहेत. या भक्तिमयपूर्ण कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले. भजनसंध्या कार्यक्रमात श्रीरामभक्त मंत्रमुग्ध

पुणे – प्रभू श्रीरामाची सुमधूर भजने... रामनामाचा गगनभेदी जयघोष... माता सीतेच्या नावाचा गजर... अन् राम भक्तांचा जोरदार जल्लोष.. अशा राममय व भक्तिमय वातावरणात सोमवार ७ एप्रिल रोजी आयोजित भजन संध्या कार्यक्रम संपन्न झाला. सुप्रसिद्ध राम भजन गायक आदित्य गोयल व रितु पांचाल यांच्या गोड कंठातून सूर–तालबद्ध आणि मधूर श्रीराम भजनांनी उपस्थित रामभक्त अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम नवमी व जन्मोत्सवाच्या निमित्ताने पुण्यातील श्रीराम सेवा समितीच्या वतीने स्थानिक अल्पबचत भवनात भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रभू श्रीरामाचे भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.या भजन संध्या कार्यक्रमाला जयभगवान गोयल, ईश्वरचंद गोयल, पवन बंसल, पवन चमाडिया, गुंजन नवाल, नरेंद्र गोयल, प्रेम मित्तल, सतीश अग्रवाल, योगेश जैन, सागर अग्रवाल यांच्यासह मोठ्या संख्येने अग्रवाल समाजातील महिला–पुरुष व श्रीराम सेवा समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जलजिवन योजनेची लावली वाट

## चर्चा:खवतड नावाचा गुत्तेदार भलताच करामती

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:तालुक्यातील टाकळी,काळेगाव, आनेगाव,बेलगाव ,मध्ये जल जिवन काम बोगस गुत्तेदाराने जलजिवनचे काम बोगस केले आहे म्हणजे ज्या जलजिवन योजनेचे काम आले होते पण कामच झाले नाही गुत्तेदार पेसै खाऊन मोकळा बेलगाव मध्ये जलजिवनचे काहीच काम नाही सुशांत खवतड नावाचा गुत्तेदार बील ही उचलतो तर मग अधिकारी काय झोपा काढतात काय जलजिवनची पाईप लाईन करण्यासाठी आलेल्या नळ्या सुध्दा त्या सुशांत खवतड नावाच्या गुत्तेदाराने गेली एक वर्षापासुन गायप केल्या आहेत केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये विजय कन्स्ट्रक्शन कंपनीने भोगस कारभार करुन अनेक गावांमध्ये त्या गुत्तेदारानी जलजिवनच्या कामात कोट्यवधी रुपयांचा निधी हडपला आहे त्यांच प्रमाणे बेलगाव मध्ये तर काहीच काम केले नाही अशा भोगस काम करणाऱ्या गुत्तेदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकले पाहिजे नेमकं बेलगाव येथे जल जीवन चे काम करणाऱ्या या गुत्तेदाराला कोणत्या नेत्याच अभय आहे या गुत्तेदाराने जलजीवन च्या नावाखाली कोठ्याधिश रुपयाचा निधी हडप केला आहे या वर तात्काळ कारवाई झाली इतक्या कडक उन्हाळ्या मध्ये फक्त अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे गावाला पाणी पिण्यासाठी नाही सुशांत खवतड नावाच्या गुत्तेदारावर तात्काळ कारवाई करा अशी मागणी बेलगाव मधील नागरिक करीत आहेत.

पान एक वरून

**खा. बजरंग सोनवणे पहिले हे सांगा की**

एम सुरेश, निगम, एस.आर.कुवर, संजय श्रीवास्तव, यादव, एस.के.मंडल, मानसिंग हे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी अहमदनगर–बीड–परळी रेल्वेमार्गाला विद्युत जोडणीच्या कामाची सद्यस्थिती, आष्टी येथील स्थानकास विद्युत जोडणी देणेबाबतच्या कामाची सद्यस्थिती तसेच बीड ते वडवणी बीटमधील विद्युतलाईनचे कामाची स्थिती. वडवणी ते सिरसाळा बिट कामाची सद्यस्थिती याबाबत सविस्तर आढावा घेतला. सुकळी, खामगाव व तपोवन या भागातील नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन रेल्वेमार्गामधे प्रस्तावित करायच्या अतिरिक्त उपाययोजना, सिरसाळा ते परळी कामाची सद्यस्थिती. परळी–परभणी डबल लाईन कामामुळे बाधित होत असलेल्या (परळी)आजादनगर येथील नागरिकांवर कसलाही अन्याय होणार नाही याची दक्षता घेऊन सदरील काम तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बीड– नगर–मुंबई व बीड–नगर–पुणे इंटरसिटी सेवा चालू करणेसाठी करावयाच्या कामांबद्दल सुचना दिल्या. रायमोह, धनगरवाडी यासह अनेक भागातील शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीचा मावेजा बाबत निर्देश दिले. दरम्यान दि.१८ जून २४ च्या रेल्वे प्रकल्प बैठकीमधे ठरल्यानुसार आहिल्यानगर–बीड–परळी रेल्वेमार्ग प्रकल्पातील बीडपर्यंतचे काम व गती चाचणी वेळेत पूर्ण केल्याबद्दल खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे विभागाचे सर्व अधिकारी, भुसंपादनाशी संबंधित महसूल विभागाचे अधिकारी व विद्युत विभागाचे संबंधित अधिकारी या सर्वांचे आभार मानत अभिनंदन केले.

**पौळाचीवाडी येथे**

करण्यात यावा या मागणीसाठी गावातील सामाजिक कार्यकर्ते शरद जाधव हे पौळाचीवाडी येथील मंदिरात बुधवारी उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या या आंदोलनाला ग्रामस्थांनी पाठिंबा दर्शविला आहे. मात्र तीन दिवस उलटून देखील या आंदोलनाकडे प्रशासनाचा कोणताही अधिकारी फिरकला नाही. त्यामुळे ग्रामस्थांच्या समस्या बाबत प्रशासन उदासीन असल्याचे यावरून दिसून येते. दरम्यान शरद जाधव यांच्या या आंदोलनाला अनिल शेंडगे, सुदाम पवार, पाराजी गायकवाड, रामनाथ मराठे, आण्णासाहेब साळुंखे, सिद्धेश्वर घार्गे, अर्जुन जाधव, धर्मराज पौळ, पांडुरंग जाधव, बबनराव माने, पिंटू पौळ, आर्जुन पौळ, श्रीमंत शेंडगे, सुरेश शेंडगे, रामनाथ पिकवणे ,बिभीषण पठाडे, मछींद्रनाथ पौळ, भिमराव पिकवणे, जालींदर धुमाळ, गोरख साळुंखे, भाऊसाहेब पिकवणे, रामजी तुळसीराम पौळ, भारत साळुंखे, कचरू पौळ पाटील, महादेव महाराज पौळ, हनुमान मैंद, कृष्णा पौळ, भारत अशोक पौळ आदींसह ग्रामस्थांनी पाठिंबा दर्शविला आहे.

**चिंचोली माळी अवैध दारु**

चिंचोली माळी येथील धाबे राज्यमार्गवर आहेत व येणाऱ्या जाणाऱ्या महीला असतील किंवा शाळेतील लहान मुले असतील यांना रोडवर असणाऱ्या धाब्याचा खुप मोठा त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे बीड येथील पोलिस अधीक्षक कॉवत साहेब यांनी चिंचोली माळी येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे तसेच चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**रेल्वे स्थानक धानोरा**

घालण्याच्या हेतूने रेल्वे स्थानक दुसरीकडे करावे या मागण्यांचे निवेदन देत आंदोलनाचा इशारा देत आहेत. त्या संघटनांना आज संभाजी सुर्वे यांनी चांगलेच सुनावले आहे. सुर्वे बोलतांना म्हणाले की, बीड जिल्ह्याचा अस्मितेचा असणारा रेल्वेचा विषय भाजपा सरकारच्या सकारात्मक निर्णयामुळे उत्तम प्रकारे मार्गी लागत आहे त्या मध्ये काही संघटना खोडा घालण्याचे काम मुद्दामून करत आहेत. नाहक रेल्वे स्थानकचे ठिकाण कायम झालेले असताना देखील रेल्वे स्थानक हटावची मागणी करत आहेत. ज्याने करून रेल्वेच्या कामात खंड पडेल. या संदर्भात माझे असे मत आहे की, त्यांनी यात वेळ वाया घालवण्यापेक्षा दुसऱ्या सामाजिक प्रश्नांवर लक्ष दिले पाहिजे आणि रेल्वे मध्ये आपली विनाकारण शक्ती व्यर्थ लाऊ नये अन्यथा त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल असे आवाहन या वेळी भाजपा नेते संभाजी सुर्वे यांनी केले आहे.

**विद्यार्थ्यांसह पालकांचेही**

लक्ष्मण वैराळ, वैजनाथ कळसकर, जितेंद्र मस्के, राजेश सरवदे, गौतम साळवे, संदीप ताटे, पिंटू डापकर, कवी मुख्तार पानगावकर, विलास ताटे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भगवान साकसमुद्रे यांनी केले, तर आनंद तुपसमुद्रे यांनी सूत्रसंचालन आणि श्रीकांत पाथरकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विठ्ठलराव झिलमेवाड, कवी बा. सो. कांबळे, पत्रकार विकास वाघमारे, नवनाथ दाणे, प्रा. ब्रम्हानंद कांबळे, विद्याधर शिरसाट, विनायक काळे, आकाश देवरे आणि सम्राट गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

**महात्मा फुले सामाजिक क्रांतीचे**

साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने अंबाजोगाई दत्त नगर येथे दिनांक ११ एप्रिल रोजी ज्ञानाची गंगा प्रवाहित करणारे तसेच समाजसुधारक क्रांती सूर्य स्त्रियांच्या जिवन प्रकाश मय करणारे महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन साजरी करण्यात आली

या वेळी उपस्थित महिला सौ संगीता के तुपसागर,आरती दहिवाळ, सरिता ताई दहिवाळ, सारीका ताई दहिवाळ, पल्लवी ताई लखेरा, राणी ताई सातपुते, अश्विनी हिरवे, अंबिका हिरवे, रुकमीनी कांबळे, विद्या शिंदे, उपस्थित होत्या,

**देशासह राज्यात उष्णतेची**

राहणार आहेत.महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाकडून देखील २८ मार्च रोजी नोटीस जारी करण्यात आली आहे. या नोटीसीद्वारे शाळेच्या वेळांमध्ये बदल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील सर्व शाळा या सकाळी ७ ते ११:१५ पर्यंतच सुरू ठेवाव्यात, हा नियम सर्व शाळांसाठी लागू असेल असं शिक्षण विभागानं म्हटलं आहे. विद्यार्थ्यांसाठी शाळेत थंड पाण्याची सोय करा, तसेच त्यांना हंगामी फळं आणि भाज्या खाण्यासाठी प्रोहत्सान द्या असं देखील शिक्षण विभागानं म्हटलं आहे.तेलंगणामध्ये देखील प्रचंड उष्णता आहे. तेलंगणाच्या शिक्षण विभागाकडून २४ एप्रिल पासून ११ जून पर्यंत शाळांना सुट्टीची घोषणा करण्यात आली आहे. तेलंगणासह इतर राज्यांमध्ये देखील शाळेच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. दरम्यान पुढील काळात उष्णता आणखी वाढू शकते. मे महिन्यात उन्हाचा कडाका आणखी वाढेल असा इशारा देखील देण्यात आला आहे.

**शेतकरी भवनाचा प्रश्न**

करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी ही मागणी राज्य शासनाकडे करून पाठपुरावा करून सदर प्रशासकीय मान्यता प्राप्त करून दिली असून, याबद्दल अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड राजेश्वर आबा चव्हाण, उपसभापती श्री करनर यांच्या सह सर्व संचालक मंडळाच्या वतीने राज्य शासनाचे व आ. धनंजय मुंडे यांचे आभार मानले आहेत.

पान सहा वरून

**कुणी कितीही अडथळे आणा**

लांबडे, लिंबराज कर्डीले, नानाभाऊ वाडेकर, नवनाथ विधाते, गौतम ससाणे, सोपान गाडे, नंदु फसले, विठ्ठल लांडगे, बाळासाहेब शेकडे, नानाभाऊ वाडेकर, परमेश्वर खेडकर, युवराज खटके आबा तावरे,बबन सांगळे,मोहन झगडे, शेख, अतुल मुळे, सोनाजी गांजुरे, कुंडलीक आस्वर ,शेख अज्जुभाई, बाबासाहेब गायकवाड, बाबासाहेब गर्जे इत्यादी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

**केजला रेल्वे मार्गाशी**

येडशी–कळंब–केज–अंबेजोगाई–परळी किंवा अहमदनगर–पाटोदा–केज–अंबेजोगाई–घाटनांदूर या मार्गानेही केजला रेल्वे कनेक्टिव्हिटी दिली जाऊ शकते. केंद्रशासनाने यापैकी कोणत्याही एका योग्य व अनुकूल मार्गाने केज शहर व तालुक्याला रेल्वेसेवेशी जोडून द्यावे अशी मागणी केजच्या रेल्वे कृती समिती व केज विकास संघर्ष समितीने बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे आणि केज तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीसाठी वेळोवेळी पाठपुरावा करण्याचा निर्धार केज तालुका रेल्वे कृती समिती व केज विकास संघर्ष समितीने केला आहे. निवेदनावर हनुमंत भोसले, डी एस साखरे, नासेर मुंडे, महेश जाजू, प्रतापराव पाटील, शेषराव घोरपडे, संपत वाघमारे यांच्यासह नागरिकांच्या सह्या आहेत.

**सह्याद्री प्रतिष्ठाणकडून भिम**

अविनाश बनसोडे, अच्युत लाटे, रविकांत राठोड, बालसाहेब सोळंके, सुशिल डक यांचेसह अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन सह्याद्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष नवनाथ गायकवाड, कोषाध्यक्ष नारायण शेजुळ, सचिव प्रशांत शेटे, कार्याध्यक्ष दिलीप झगडे, जयंती अध्यक्ष प्रशांत प्रधान, उपाध्यक्ष सचिन जाधव, सचिव निखील घाडगे यांनी केले आहे.

**रिपब्लिकन सेनेकडून**

आदर्श निर्माण करून नवीन संदेश देण्यासा साठी हा उपक्रम सुनील शिंदे यांनी घेतला असल्याची भावना राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे सुरेश बनसोडे आणि महेश भोसले यांनी व्यक्त केले आहे या कार्यक्रमाप्रसंगी रिपब्लिकन सेनेचे जिल्ह्याचे नेते सुनील शिंदे, प्राध्यापक जयंत गायकवाड, विकास रणदिवे, अतुल भिंगारदिवे, सुनील राऊत, योगेश घोडके, किसन करपे, गंगाराम खंडागळे, शैलेश लाटणे, महेश कांबळे, सुजित घंगाळे, मनोज साळवे, प्रकाश विधाते, संदीप आल्हाट, प्रणव पाडळे यांसह फुले शाहू आंबेडकरी चळवळीतील नेते आणि रिपब्लिकन सेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**माजलगाव शहरात समताज्योत**

यांच्या कार्याचा व विचारसरणीचा जागर, तसेच सामाजिक समतेचा संदेश पोहचविण्यात येणार आहे. उपविभागीय अधिकारी मा.गौरव इंगोले व पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतल यांनी सर्व नागरिकांना या रॅलीमध्ये शिस्तबद्ध व शांततामय पद्धतीने मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. रॅलीदरम्यान पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात येणार आहेत.समतेचा दीप घेऊन सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल केवळ डॉ.आंबेडकरांच्या जयंतीपुरते मर्यादित नसून, समतेच्या समाजरचनेच्या दिशेने एक प्रभावी पाऊल ठरेल.ही रॅली केवळ एक मिरवणूक न राहता, सर्वधर्मसमभाव, बंधुता, न्याय आणि स्वातंत्र्य या संविधानातील मूल्यांचे दर्शन घडविणारी प्रेरणादायी घटना ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, रॅलीच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करावे, आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करावे, असे आवाहन आयोजक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

**प्रत्येकाने एकदातरी**

प्रत्येकवर्षी रक्तदान शिबिर घेतले जाते. हा उपक्रम खरोखरच स्तुत्य आहे. बीडचा जयभिम महोत्सव स्वबळावर साजरा केला जात असून राज्याला एक आदर्श निर्माण करुन दिला आहे. असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.दरम्यान या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून बीड जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीचे कर्मचारी सचिन सतकर, बिभीषण म्हात्रे, दादा कुमकर, सागर फुलपगारे यांनी सहकार्य केले या रक्तदान शिबिराचे प्रस्ताविक विकास वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन सुमेध जोगदंड, सुनिल डोंगरे यांनी केले. आभार इंजि स्वप्निल चोपडे यांनी मानले दरम्यान जयभिम महोत्सवात साजऱ्या होणाऱ्या उर्वरित कार्यक्रमांना जनतेने उपस्थित रहावे. असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# अंबरनाथमध्ये अनधिकृत बांधकामांवर कारवाई

## २५ जोत्यांसह गाळे आणि घरे जमीदोस्त

◆ अंबरनाथ (प्रतिनिधी) :

अंबरनाथ शहराच्या प्रवेशद्वारावर, महत्वाच्या चौकांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत दुकाने, टपऱ्यांची संख्या वाढली आहे. त्याविरूद्ध नागरिकांत संताप वाढत असतानाच अंबरनाथ नगरपालिका प्रशासनाने शहरातील पश्चिम भागात असेलल्या जावसई परिसरातील महेंद्र नगर येथील अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली. यात २५ जोत्याची कामे, ५ गाळे आणि सात घरे जमीनदोस्त केली आहेत. अनधिकृत बांधकामांवर कारवाई केल्याने पालिकेचे कौतुक होते आहे. मात्र शहरातील रस्ते आणि चौकांमध्ये उभारण्यात आलेल्या अतिक्रमणांवरही कारवाई करावी अशी मागणी होते आहे.

बदलापूर शहरात कुळगाव बदलापूर नगरपालिका एकीकडे अतिक्रमणांवर हातोडा चालवत असताना दुसरीकडे अंबरनाथ



शहरात मात्र अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे वाढत असल्याचे चित्र आहे. अंबरनाथ शहराच्या जवळपास सर्वच चौकांमध्ये दुकाने आणि टपऱ्यांचा विळखा पाहायला मिळतो आहे. त्याचवेळी अंबरनाथ शहराचे प्रवेशद्वार असलेल्या आनंदनगर परिसरापासून लोकनगरी स्मशानभूमीपर्यंतच्या पट्ट्यात या अतिक्रमणांनी मोठे डोके वर काढले आहे.

यातील अनेक दुकाने कोणत्याही परवानगीशिवाय उभारण्यात आली आहेत. या दुकानांच्या बाहेरही दुकानाचे साहित्य पाहायला मिळते. या ठिकाणी ग्राहकही रस्त्यावरच वाहने लावून वस्तू खरेदी करताना दिसतात. परिणामी या भागात कोंडीही होते आहे. या अतिक्रमणांकडे पालिकेचा कानाडोळा होतो आहे. परिणामी पालिका प्रशासनाचा धाक यांना उरला की नाही असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

त्याचवेळी रनाथ नगरपालिका प्रशासनाने शहराच्या पश्चिम भागातील जावसई परिसरात असलेल्या महेंद्र नगर येथे सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली. येथे असलेले २५ जोत्याची बांधकामे, ५ गाळे ७ घरे यावेळी जमीनदोस्त करण्यात आली आहेत. या कारवाईने अनधिकृत बांधकाम धारकांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.

इतर ठिकाणी कारवाई कधी सध्या अंबरनाथ शहरातील विविध चौक फेरीवाले, विक्रेत्यांनी गिळंकृत केले आहेत. फॉरेस्ट नाका, आनंदनगर चौक, लोकनगरी रस्ता, मटका चौक, विमको नाका, लादी नाका अशा विविध ठिकाणी फेरिवाल्यांची वाहने उभी असतात. त्यांच्यामुळे अनेकदा वाहतूक कोंडी होत असते. काही चौकांमध्ये सिगारेट, प्रतिबंधित गुटखा विक्रीही राजरोसपणे केली जाते आहे. त्या सर्वांकडे दुर्लक्ष होते आहे.



## कल्याण ग्रामीणमध्ये फिरते पोलीस स्टेशन

**कल्याण :** ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ. धोंडोपंत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण तालुका पोलीस ठाण्याच्या ग्रामीण भागासाठी फिरते पोलीस स्टेशन (डिजीटल व्हॅन) हा अभिनव व अनोखा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. टिटवाळा येथे देखील या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. कल्याण तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील गुरवली, मांडा टिटवाळा, वासूंद्री, गणपती मंदिर व निमकर नाका अशा ठिकाणी भेट घेऊन त्यांना फिरते डिजिटल व्हॅन पोलीस स्टेशन तयार केले आहे तसेच डिजिटल व्हॅन बाबत मार्गदर्शन देण्यात आले. या महत्वाकांक्षी उपक्रमाच्या मुख्य उद्देश म्हणजे पोलीस सेवा अधिक लोकाभिमुख करणे व नागरीकांमध्ये कायद्याची जागरुकता वाढविणे, तसेच थेट जनतेपर्यंत पोहचून त्यांच्या तक्रारी ऐकणे आणि त्यांचे त्वरित निराकरण करणे हा आहे.

## वेचक

### एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी प्रताप सरनाईक

**ठाणे :** एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेल्या नियम व आदेशानुसार ही नियुक्ती



करण्यात आली आहे. प्रताप सरनाईक हे एसटी महामंडळाचे २६ वे अध्यक्ष आहेत. महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची 'लोकवाहिनी' असलेल्या एसटीला भविष्यात आर्थिक दृष्ट्या सक्षम करून एक चांगली दर्जेदार परिवहन सेवा निर्माण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. तसेच आपल्याला या पदावर नियुक्त करून महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे त्यांनी आभार मानले आहेत.

### अधिकृत परवानगीशिवाय बॅरिकेडिंग क्षेत्रामध्ये प्रवेश नाही

**ठाणे :** कोपरगाव, भिवंडी येथील पिलर बांधकामासाठी केलेल्या उत्खननस्थळी एका मुलाने पोहण्यासाठी गेल्याची दुर्दैवी घटना घडल्याचे समोर आले आहे. सदर बांधकाम स्थळी आवश्यक ती सर्व सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या होत्या. मुंबई-अहमदाबाद उच्चगती रेल्वे कॉरिडॉरसाठी एकूण ५०८ किलोमीटरच्या मार्गावर हे काम सुरू आहे. बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांसह, जड यंत्रसामग्रीच्या सुरक्षेसाठी काटेकोर उपाय अवलंबले जात आहेत. सदर प्रकरणाचा तपास स्थानिक पोलीस प्रशासन करत असून, NHSRCL आणि त्यांचे कंत्राटदार तपास प्रक्रियेसाठी पूर्ण सहकार्य करतील. बांधकाम स्थळांच्या आसपास राहणाऱ्या नागरिकांना आम्ही आवाहन करतो की, त्यांनी अधिकृत परवानगीशिवाय बॅरिकेडिंग केलेल्या क्षेत्रामध्ये प्रवेश करू नये.

### नदीत बुडणाऱ्या मुलाला वाचवताना तिघांचा मृत्यू

**शहापूर :** भातसा नदीत मायलेकासह भाची अशा तिघांचाही बुडून मृत्यू झाल्याची घटना शहापुरात घडली आहे. जीवरक्षक पथकाच्या सदस्यांनी तिन्ही मृतदेह बाहेर काढले. भातसा नदीत अंघोळीसाठी उतरलेला मुलगा बुडत असल्याचं पाहून त्याला वाचविण्यासाठी आई पाण्यात उतरली. ती देखील बुडू लागल्यानं काठावर असलेल्या भाचीनंही पाण्यात उडी मारली. मात्र, पाण्यातून बाहेर येता न आल्याने तिघांचाही बुडून मृत्यू झाला. शहापूर तालुक्यातील गोठेघर वाफे येथे ही दुर्दैवी घटना घडली. जीवरक्षक पथकाच्या मदतीनं मायलेकासह भाचीचा मृतदेह नदीपात्राबाहेर काढण्यात आला. या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शहापूर तालुक्यातील गोठेघर वाफे येथील भातसा नदीवर वनिता सुदर्शन शेळके, लक्ष्मी दत्तात्रय पाटील या दोन महिला कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. त्यांच्यासोबत धीरज दत्तात्रय पाटील हा देखील गेला होता. उन्हाची काहीली असल्याने धीरज अंघोळ करण्यासाठी पाण्यात उतरला. त्याला खोलीचा अंदाज आला नाही. तो बुडू लागला. ते बघून आईने त्याला वाचवण्यासाठी नदीपात्रात उडी मारली ती सुद्धा बुडू लागली. दोघेही बुडत असल्याचे भाचीने पाण्यात उडी घेतली. मात्र, तिघांचाही नदीत बुडून मृत्यू झाला.

### उन्हाच्या तडाख्यातून मुक्या जीवांची सुटका

**कल्याण :** उन्हाळ्याचा तडाखा तर कधी वादळ-वारा यांसारख्या हवामानीय बदलांचा फटका मनुष्यालाच नाही तर मुक्या जीवनासुद्धा बसत आहे. थंडावा किंवा पाण्याचा शोधात घोरपडीच्या पिल्लाने



इंटीरियर डेकोरेटर दुकानात आसरा घेतला. कार्यालयातील एसीच्या थंड वातावरणात प्लास्टिकच्या खुर्चीत पिल्लू दडून बसलेले आढळले. सर्प मित्र दत्ता बोंबे यांनी सदर पिल्लाची सुखरूप सुटका करून निसर्गमुक्त केले. दुसऱ्या ठिकाणी आयत्या घरात घरोबा करणारी कोकिळ पक्षी ओळखला जातो. अशाच एका ठिकाणी कावळा पक्ष्याचा घरट्यात अंडी देण्यासाठी मादा कोकिळ आली असावी, परंतु काही कारणास्तव तिच्या गळ्याभोवती प्लास्टिकचा धागा गुंडाळला गेला. तिच्या ओरडण्यामुळे अनेक कावळे तिला जीवानिशी मारू लागले. त्या आवाजाने स्थानिक रहिवासी संजय वाजपेयी कुटुंब बाहेर आले व त्यांनी कावळ्यांपासून त्या कोकिळेचे रक्षण करत सर्पमित्रांना बोलाविले. दत्ता बोंबे यांनी ४०-५० फूट उंच असलेल्या बदामाच्या झाडावर झुमरींग करत या कोकिळ पक्षाचा सुरक्षित बचाव केला. तसेच रॅपलिंग करत खाली उतरले. थोडक्यात गिर्यारोहण साहित्यांच्या आधारे कोकिळ पक्षाचा जीव वाचवून निसर्गमुक्त केलं. याप्रसंगी पक्षीमित्र नरेंद्र भिवंडीकर, प्रसाद देवरे यांनी सहकार्य केले.

### शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचवण्याचा मानस

## पालिका आयुक्त हाणून पाडणार कृत्रिम पाणीटंचाई



◆ उल्हासनगर (वार्ताहर) :

उल्हासनगर शहरातील विसंगत असलेला पाणीपुरवठा हा सुरळीत करून प्रत्येक घरात पाणी पोहोचवत महिलांवरील पाणी भरण्याचा भार कमी करून त्यांना सुखावणार असल्याचे आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी सांगितले. त्यासाठी त्यांनी एमआयडीसीकडून येणाऱ्या पाणीपुरवठा ते घराघरात पोहोचणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या प्रमाणाचे ऑडिट करीत असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

उल्हासनगर शहराच्या लोकसंख्येला १०० दशलक्ष लिटर पाणी हे पुरेसे आहे. असे असताना जवळपास १४० दशलक्ष लिटर एवढा पाणीसाठा दररोज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून घेतला जातो. हा पाणीसाठा शहाड आणि जांभूळ या दोन प्रक्रिया केंद्रातून एमआयडीसी पुरवते. शहाड जलशुद्धीकरण केंद्रातून येणारा पाणीपुरवठा हा तानाजी नगर आणि रमाबाई येथील साठवण टाकीमध्ये घेतला जातो. तेथून गुरुत्वाकर्षणाच्या माध्यमातून कॅम्प एक, दोन, तीन आणि चार मधील काही जलकुंभाना पुरवला जातो. तर जांभूळ जलशुद्धीकरण केंद्रातील येणारा पाणीपुरवठा हा पालेगाव मार्फत आकाश कॉलनी येथील साठवण टाकीमध्ये घेतला जातो. तेथून तो कॅम्प चार आणि पाचच्या जलकुंभाना दिला जातो. या जलकुंभामधून ठराविक वेळेनुसार घरोघरी पाणी पुरवले जाते.

मागील महिन्याभरात उन्हाळा सुरू झाल्यापासून प्रत्येक प्रभागामधून पाणीटंचाईच्या तक्रा पालिका आयुक्त मनीषा आव्हा यांना प्राप्त होत होत्या. या तक्रा करणाऱ्यांमध्ये महिला ह्या मोठ प्रमाणात आहेत. काही नगरसेवकां उपोषण लावून पालिका प्रशासना या पाणीटंचाईकडे लक्ष वेधले. बाब लक्षात घेत मनीषा आव्हा यांनी नव्याने पदभार स्वीकारले उपायुक्त अनंत जवादवा कार्यकारी अभियंता अशोक घु उप अभियंता दीपक ढोले, परमेश्व बुडगे यांच्याबरोबर क्षेत्रीय पाह दौरा केला. यावेळी आयु मनीषा आव्हाळे यांनी पाणीपुरव विभागाच्या अधिकारी आणि कर्मचा यांना जलवाहिनीवरील पा गळत्या काढणे, दैनंदिन देखभा दुरुस्तीबाबत कार्यवाही कर सर्वेक्षण करून अनधिकृत न जोडणी धारकांवर कडक कारव करणे, पाणी वितरणाचे वेळापत्र बनवणे, नागरिकांना सुरळीत समान पाणीपुरवठा होईल या दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

त्याबाबत पालिका आयु मनीषा आव्हाळे यांना विचार असता त्यांनी सांगितले की, शेवटच टोकापर्यंत पाणी पोहोचवणे हे आम कर्तव्य आहे. हे लक्षात घेऊन पालि प्रशासन हे पाणीपुरवठा विभागा ऑडिट करत आहे. त्या आधारा एका घराला कमी तर दुसऱ्या घरा जास्त होणारा पाणीपुरवठा नियंत्रण आणून शेवटच्या टोकापर्यंत आम पाणी पोहोचवणार आहोत. ए घरात एकापेक्षा जास्त असलेल जलवाहिन्या कापण्याचे तसे वॉटर मीटर बसविण्याचे का प्रशासनाकडून केले जाणार आहे.

## वीज वितरण यंत्रणेच्या पावसाळापूर्व कामांना वेग

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

कल्याण आणि भांडुप परिमंडलात वीज वितरण यंत्रणेच्या पावसाळापूर्व देखभाल-दुरुस्तीच्या कामांना वेग देण्यात आला आहे. या कामांमुळे पावसाळापूर्व वादळवारा व मान्सुनच्या सुरुवातीला खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याची तीव्रता कमी होण्यास मदत मिळेल. संबंधित भागातील वीज ग्राहकांना पूर्वकल्पना देणारे मेसेज त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर पाठवून त्या-त्या भागात देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत असून या कामांसाठी सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

देखभाल-दुरुस्तीच्या कामातून वीज वितरण यंत्रणेची कार्यक्षमता व जीवनमान वाढण्यास मदत होते. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यापूर्वी साधारणतः एप्रिल आणि मे महिन्यात वीज वितरण यंत्रणेची कामे केली जातात. त्यानुसार कल्याण आणि भांडुप परिमंडलात यावर्षी तापमानाचा पारा चाळीशी पार झालेला असतानाही महावितरणचे कर्मचारी, कंत्राटी कामगार आणि कंत्राटदाराचे (एजन्सी) कामगारांनी रणरणत्या उन्हात देखभाल-दुरुस्तीची कामे केली आहेत. देखभाल-दुरुस्तीच्या कामांसाठी विभागनिहाय इनपॅनलमेंट एजन्सीची (कंत्राटदार) नियुक्ती करण्यात आली आहे. महावितरणचे नियमित कर्मचारी, बाह्यस्त्रोत (कंत्राटी) कामगार आणि एजन्सीच्या कामगारांकडून एकत्रितपणे देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.



देखभाल व दुरुस्तीच्या कामांमध्ये वीज वितरण रोहित्र (डीपी), उपकेंद्र तसेच उच्चदाब व लघुदाब वीज वाहिन्यांची कामे तसेच वीज वितरण यंत्रणेत अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात येते. सर्वेक्षणानंतर आवश्यक कामांची निवड करून स्वंयचलित एनडीएम प्रणालीत संबंधित काम व भागांची माहिती भरण्यात येते. त्यानुसार संबंधित भागातील वीज ग्राहकांना प्रणालीमार्फत वीज बंद ठेवण्यात येणाऱ्या कालावधीबाबत पूर्वकल्पना देणारे मेसेज त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर पाठवले जातात. कल्याण व भांडुप परिमंडलातील ग्राहकांनी देखभाल-दुरुस्तीच्या अत्यावश्यक कामात सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## 'आरटीई' प्रवेशासाठी प्रतीक्षा यादी टप्पा २ प्रवेश फेरी सुरू

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

जिल्ह्यातील बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार, दरवर्षीप्रमाणे २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. मंगळवार ८, एप्रिल रोजी प्रतिक्षा यादी टप्पा क्र. २ मधील ९५५ विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

सदर प्रवेश प्रक्रियाची मुदत ८ एप्रिल ते १५ एप्रिल पर्यंत देण्यात आली आहे . यादीतील विद्यार्थ्यांच्या पालकांना एसएमएस पाठविण्यात येत आहे. प्रतिक्षा यादीतील बालकांचे पालकांना शाळेच्या रिक्त जागेनुसार एसएमएस पाठविण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

पालकांनी आरटीई पोर्टलवरील 'अर्जाची स्थिती' या टॅबवर आपल्या बालकांचा अर्ज क्रमांक टाकून अर्जाची स्थिती पहावी, तसेच वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे अवलोकन करावे. प्रतिक्षा यादीतील बालकांच्या पालकांनी अलोटमेंट लेटर व आवश्यक कागदपत्रे घेऊन विहित मुदतीत नजिकच्या पडताळणी केंद्रावर जावे. पडताळणी समितीकडून १५ एप्रिल रोजीपर्यंत कागदपत्रांची तपासणी करून आपल्या बालकांचा ऑनलाईन प्रवेश निश्चित करावा, असे





आवाहन शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती व महानगर पालिका अंतर्गत एकूण ६२७ पात्र शाळा असून एकूण ११ हजार ३२० रिक्त जागा उपलब्ध होते व आतापर्यंत ७ हजार ९४५ प्रवेश झाले आहेत. प्रतीक्षा यादी टप्पा क्र. ०२ मधील ९५५ विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## केडीएमसीच्या कर्मचाऱ्याला लाच प्रकरणी रंगेहाथ पकडले

◆ कल्याण (प्रतिनिधी) :

कल्याण-डोंबिवली महापालिकेतील आय प्रभाग क्षेत्रामध्ये कार्यरत असलेले कर्मचारी संतोष पाटणे यांना बुधवारी ठाणे लाच लुचपत विभागाच्या पथकाने सापळा रचून दीड हजारांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडून अटक करण्यात आली आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आय प्रभागात एका नागरिकांनी मॅरेज सर्टिफिकेट मिळवण्यासाठी अर्ज केला होता. सदर दाखला तात्काळ मिळावा यासाठी त्यांनी महापालिकेच्या आय प्रभागातील नागरिक सुविधा केंद्रामध्ये अर्ज केला होता. तो अर्ज तात्काळ हवा असल्यास पाटणे यांनी त्यांच्याकडे पैशाची मागणी केली होती.

याबाबत सदर नागरिकांनी ठाणे लाच लुचपत विभागाकडे तक्रार केली होती. त्यानुसार आज दुपारी महापालिका कर्मचारी पाटणे यांनी सदर नागरिकाकडून तत्काळ मॅरेज सर्टिफिकेट देण्यासाठी दीड हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक केली. याप्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## देशी बनावटीचे पिस्तूल बाळगल्या प्रकरणी एकाला अटक

**कल्याण :** कल्याणात दे बानवटीचे पिस्तुल घेऊन फिरणा एका आरोपीला कल्याण क्राई ब्रॅन्च पोलिसांनी अटक केली आ कल्याणाच्या नेतीवली चक्कीना परिसरात एक इसम देशी बनावटीच पिस्तूल व काडतुसे बाळग असल्याची माहिती कल्याण क्राई ब्रँचला मिळाली होती. या माहितीच आधारे पथकाने सापळा रचत बिंदा म्हात्रे तरुणाला बेड्या ठोकल आहेत. त्याच्याकडे देशी बनावटी पिस्तुलासह ६२ हजारांचा शस्त्रसा जप्त केला आहे.

## 'शिकवण्याची पद्धत बदलावी लागेल'

◆ कल्याण (प्रतिनिधी) :

"आजकाल कोणीही बग्गीमध्ये कामावर जात नाही. बटण-आधारित मोबाईलवरून, आपण अँड्रॉइड मोबाईलकडे, गुहांमधून अपार्टमेंटकडे, काळ्या आणि पांढऱ्या टेलिव्हिजनवरून आपण स्मार्ट टीव्हीकडे वळलो आहोत. जग बदलत आहे, विश्व बदलत आहे. मुलांकडेही स्मार्ट फोन आहेत, म्हणून आता आम्हा शिक्षकांनाही आपल्या शिकवण्याच्या पद्धती बदलाव्या लागतील." असे मत माइंडसेट गुरू प्रोफेसर डॉ. दिनेश गुप्ता यांनी व्यक्त केले. तारापूर विद्या मंदिरात शिक्षकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

जीवनदीप पब्लिकेशन्सच्या सहकार्याने कौशल्य विकास आणि नवोपक्रम या विषयावरील



विशेष शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सुमारे ४७ शिक्षकांसह इतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. प्राचार्य जॉन, समन्वयक मनीषा चव्हाण आणि पर्यवेक्षक चौधरी यांच्या देखरेखीखाली हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. जे नवीन विकसित अध्यापन पद्धती, मानसिकता, विशेष प्रयोग, नावीन्यपूर्णता आणि समग्र विकासाने भरलेले होते.

## १४ एप्रिलसाठी कोपरी पोलीस सज्ज

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४ एप्रिल रोजी देशभर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत असून, ठाणे पूर्व भागातही दरवर्षीप्रमाणे भव्य आणि आदर्शवत मिरवणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे. मात्र, या उत्सवाचा उत्साह सुरळीत आणि शिस्तबद्ध राहावा यासाठी कोपरी पोलीस ठाण्याच्या वतीने विशेष तयारी करण्यात आली असून, नुकतीच शांतता मोहल्ला कमिटीची बैठक पार पडली.

सण उत्सवाच्या दिवसात मिरवणुकीत कार्यकर्त्यांच्या उत्साह ओसंडून वाहत असला, तरी या उत्साहाला गालबोट लागणार नाही, यासाठी काळजी घेणं तितकीच महत्वाचे असते.

> गेल्या काही वर्षांत सोशल मिडियावरून अफवा पसरण्याचे प्रकार वाढले आहेत. हे लक्षात घेता, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या आदेशाने पोलिसांनी विशेष दक्षता घेतली आहे. नागरिकांनी देखील कोणतीही अपप्रचारात्मक किंवा चिथावणीखोर पोस्ट फॉरवर्ड करू नका.
>
> **- मंदार जवळे** (सहाय्यक पोलीस आयुक्त)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त ठाणे पूर्व भागात आदर्शवत मिरवणूक काढली जाते. आनंद नगर सिद्धार्थ नगर, आनंद सिनेमा, मंगला हायस्कूल अष्टविनायक चौक पुढे श्रमदान सोसायटी येथे सांगता होणार आहे.

> मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या प्रत्येकाने अनोळखी व्यक्तींवर लक्ष ठेवावे आणि संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, कायदा–सुव्यवस्थेला धोका निर्माण होईल, असे वर्तन टाळावे."
>
> **- निशिकांत विश्वकार,** (वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोपरी पोलीस ठाणे)

या बैठकीत सहाय्यक पोलीस आयुक्त. मंदार जावळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निशिकांत विश्वका पोलीस निरीक्षक प्रदीप केरक संजय नलावडे, वाहतूक शाखेच पोलीस निरीक्षक वैशाली रासक स्थानिक सामाजिक कार्यक मान्यवर नागरिक आणि विवि संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित हो यावेळी पोलिसांनी सर्व उपस्थितां मार्गदर्शन करताना मिरवणुक सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यां शिस्त पाळावी, ध्वनीप्रदूषणाचे निय पाळावेत, आणि कुठल्याही वादग्र गोष्टींना खतपाणी घालू नये, याक विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयं निमित्त सामाजिक संस्थांकडू विविध कार्यक्रमाचे आयोजन के जात. यावेळी संस्थांकडून केल जाणाऱ्या सामाजिक उपक्रमां परीक्षण करून त्यांचा गुणगौ करण्याची सूचना शांतता कमि सदस्य भरत मोरे यांनी केली.


### वारसा संवर्धन करण्याची इतिहासप्रेमींची मागणी

## ऐतिहासिक सिद्धगडाच्या पाऊलखुणा नामशेष होण्याच्या मार्गावर

◆ मुरबाड (वार्ताहर) :

तालुक्यातील ऐतिहासिक असलेला सह्याद्री पर्वत रांगेतील निसर्गरम्य सिद्धगड किल्ल्यावरील पाऊलखुणा सध्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे या किल्ल्योच संवर्धनकरण्याची मागणी इतिहासप्रेमींमधून होत आहे.

सह्याद्री पर्वत रांगेतील मुरबाड तालुक्यातील सिद्धगड हे निसर्गरम्य तसेच वीर हुतात्मा भाई कोतवाल व वीर हुतात्मा हिराजी पाटील या दोन वीरांना ठिकाणी भारत भूमीसाठी प्राणाचं बलिदान दिले. बलिदानभूमी म्हणून मुरबाड तालुक्यातील



> "छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवशाहीचा साक्षीदार हा गिरीदुर्ग प्रकारचा किल्ला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याण भिवंडी सुभे ताब्यात घेतले तेव्हा इ.स. १६५७ च्या दरम्यान तो स्वराज्यात आला. इ.स.सन १६८९ ते इ.स. २ जानेवारी १९४३ या कालखंडत या किल्ल्यावर एकूण बारा लढाया झाल्या त्यात कधी मराठे तर कधी मोगल यांनी किल्ला जिंकून घेतला आहे."
>
> **- योगेंद्र बांगर,** इतिहास अभ्यासक

सिद्धगड हे ठिकाण विख्यात झाले. या ठिकाणी पाण्याची विपुल कुंडे असून स्वच्छ पाणी, धान्याची कोठारे, सैनिकाच्या बराकी, उद्ध्वस्त वाड्यांचे अवशेष अशा इतिहासाच्या विखुरलेल्या खुणा या गडावर आजही शतकानुशतके ऊन, वारा, पाऊस झेलत असल्याचे दिसून येत आहे.या सिद्धगडाच्या पाऊलखुणा सध्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे या किल्ल्योच संवर्धनकरण्याची मागणी इतिहासप्रेमी करत आहे. मुरबाडमध्ये सध्या तोफा असणारा सिध्दगड हा एकमेव किल्ला आहे. या किल्ल्याचे प्राचीनत्व सिध्द झालेले आहे.

गडाच्या माचीवर नारमाता मंदिर परिसरात अनेक वीरगळ आहेत. किल्ल्याच्या ऐतिहासीक पाऊल खुणांचे दर्शन सिद्धगड दर्शन या पुस्तकातून इतिहास संशोधक योगेंद्र बांगर व अविनाश हरड यांनी घडवले आहे. काही वीरगळ मातीच्या ढिगाऱ्याखाली दडलेल्या असाव्यात असा उल्लेख योगेंद्र बांगर यांच्या सिद्धगडाच्या बारा लढाया या पुस्तकात उल्लेख आढळतो.

## अंशकालीन श्रमिक कामगारांच्या सुरक्षेसाठी बैठक

◆ भाईंदर (वार्ताहर) :

अंशकालीन श्रमिक कामगारांच्या नोंदणीबाबत तसेच वेतन, सेवा अटी, सुरक्षितेची उपाययोजना यासाठी श्रम भारतीय जनता कामगार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी अतिरीक्त कामगार आयुक्त आणि उप निबंधक यांच्यासह उच्चस्तरीय अधिकारांच्या बैठकीचे आयोजन केले होते.

श्रम भारतीय जनता कामगार महासंघाचे अध्यक्ष गणेश ताठे, कार्याध्यक्ष डॉ. अमित भोसले, सरचिटणीस प्रमोद जाधव आणि चंद्रकांत महाडिक यांच्या उपस्थितीत अतिरीक्त कामगार आयुक्त बाळासाहेब वाघ आणि उप निबंधक संतोष कोकाट यांची कामगार आयुक्त कार्यालयात बैठक झाली.



त्यात विविध उद्योगांतील (गिग) अंशकालीन श्रमिक कामगारांच्या समस्यावर चर्चा करण्यात आली. कामगारांच्या नोंदणीबाबत तसेच वेतन, सेवा अटी आणि सुरक्षितेची उपाययोजना या बाबींचा आढावा घेण्यात आला. महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी कामगारांच्या अडचणी प्रभावीपणे मांडत तातडीने उपाययोजना राबविण्याची मागणी केली.

कामगारांचे हक्क आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी महासंघ सदै कटिबद्ध असल्याचे गणेश ता यांनी सांगितले. तर कामगारांसा धोरणात्मक निर्णय घेण्यावर भ देण्याचे महत्त्व डॉ. अमित भोस यांनी अधोरेखित केले.कामग आयुक्त कार्यालयाच्या वत कामगार कल्याणासाठी आवश्य त्या सर्व उपाययोजना तातडी करण्यात येऊन यासाठी शास स्थरावर धोरण ठरविण्याचे काम सु असल्याचे सांगण्यात आले.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या दुखण्यावर तोडगा कधी निघणार?

राज्य सरकारमध्ये कार्यरत असणाऱ्या मंत्रालयीन तसेच विविध शासकीय आस्थापनेचे कर्मचारी, अगदी स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी वेतनाबाबत समाधानी असतात, त्यांना नियमित वेतनवाढ होत असते. वाढत्या महागाईच्या तुलनेत त्यांच्या वेतनवाढीचा ग्राफही उंचावत असतो. हे मासिक वेतन त्यांना नियमितपणे प्राप्तही होत असते. वर्षभर काम केल्यावर मिळणारा बोनस, सानुग्रह अनुदानही समाधान करणारे, दिलासा देणारे असते. राज्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत बोलावयाचे झाल्यास सर्वच बाबतीत 'ओला दुष्काळ' असताना याला एसटी कामगारांच्या समस्येचे ग्रहण लागावे, इतपत आजमितीस भयावह चित्र निर्माण झालेले आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या पाचवीच्या दिवशी सटवाईने कदाचित आर्थिक ससेहोलपटचे भाकीत लिहिलेले असावे. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून एसटी कर्मचारी व अधिकारी आर्थिक समस्येच्या चक्रव्यूहामध्ये भरडले जात आहेत. अनेकदा आंदोलने करूनही, निदर्शने करूनही त्यांच्या समस्यांचे आजतागायत निवारण झालेले नाही व सध्याचे चित्र पाहता नजीकच्या काळातही यात फारसा बदल होईल, असे वाटतही नाही. एप्रिल महिन्याची १० तारीख लोटलेली असताना शासकीय तसेच खासगी आस्थापनेतील कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन मिळालेले आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्याच्या १० तारखेला एकूण वेतनाच्या जेमतेम अर्धाच पगार खात्यामध्ये जमा झाला आहे. उर्वरित पगार लवकरच खात्यात जमा होईल, असे उत्तर त्यांना शासनाकडून देण्यात आलेले आहे. मुळातच महिना भरल्यावर कर्मचारी आतुरतेने वेतनाची वाट पाहत असतात. मागील महिन्यात केलेल्या परिश्रमाच्या मोबदल्यावर त्यांची या महिन्याच्या आर्थिक समीकरणाची जुळवाजुळव सुरू असते. त्यातच आपल्या बँक खात्यात केवळ अर्धाच पगार जमा झाल्याचे समजल्यावर त्या कर्मचाऱ्यांची मानसिक अवस्था काय होत असेल, याची कल्पनादेखील करणे अवघड आहे. एसटी कर्मचाऱ्यांनी वेतनवाढ व अन्य समस्यांसाठी काही वर्षांपूर्वी प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडले होते, महिन्याहून अधिक कालावधी लोटला तरी एसटीच्या बसेस आगाराबाहेर पडल्या नव्हत्या. रस्त्यावर एसटीची एकही बस धावताना पाहावयास मिळाली नव्हती. आज प्रवासी सुविधेमध्ये अनेक बदल होत असले, खासगी प्रवासी सुविधांचा आलेख उंचावत असला तरी राज्यात एसटीच्या प्रवासी सेवेचे कोणीही बरोबरी करू शकत नाही. एसटीच्या प्रवासी सुविधेमुळेच आज खऱ्या अर्थाने प्रवासी तिकिटांचे दर आवाक्यात आहेत अन्यथा खासगी प्रवासी सुविधा देणाऱ्यांनी आर्थिक लुटमार बेमालूमपणे केली असती. या आंदोलन काळात महाराष्ट्रातील जनतेचे अतोनात हाल झाले. खासगी प्रवासी सुविधेला प्रशासनाकडून त्या काळात अल्प कालावधीकरिता संरक्षण देण्यात आले असले तरी त्यांच्याही सेवा पुरविण्याला अखेर मर्यादा पडल्या. एसटीची प्रवासी सुविधा आर्थिक नफ्याची सांगड न घालता प्रवाशांच्या समाधानाकरिता व त्यांना गावागावात प्रवासी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एसटीची बस धावत आहेत. एसटीचे चालक वाहकांना रात्रीच्या मुक्कामाच्या ठिकाणी सुसज्ज शयनगृहे उपलब्ध नसतात. त्यांना मिळेल त्या जागेवर रात्र काढावी लागते. अनेकदा एसटी बसमध्ये रात्रीची झोप घ्यावी लागत असल्याचे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पाहावयास मिळत आहे. असे असतानाही एसटी कर्मचारी, अधिकाऱ्यांची कमी वेतन, वेतनास विलंब ही आर्थिक ससेहोलपट कायम असावी, ही त्या कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या नशिबाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.

एसटी कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा काढताना न्यायालयात राज्य सरकारने एसटी कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या वेतनाची जबाबदारी स्वीकारली होती; परंतु त्या जबाबदारीचे पालन करण्यास राज्य सरकारकडून प्रत्येक महिन्याला चालढकल केली जात असल्याने आर्थिक संकटाच्या चक्रव्यूहामध्ये एसटीचे कर्मचारी, अधिकारी भरडले जात आहेत. दर महिन्याला एसटी महामंडळाला राज्य सरकारकडून वेळेवर तोही माफक प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जात नाही. आजही एसटी महामंडळाचे दररोजचे प्रवासी उत्पन्न काही लाखांच्या घरात आहे. त्या त्या काळातील सत्ताधारी राजकीय घटकांनी प्रवाशांना सुविधा देण्याच्या नावाखाली एसटीच्या उत्पन्नात घट आणली आहे. मात्र ही घट भरून काढण्यासाठी एसटी महामंडळाला निधी उपलब्ध करून देणे, ही त्या त्या सत्ताधाऱ्यांची जबाबदारी असते. पण हीच जबाबदारी राज्य सरकारांनी न स्वीकारल्याने एसटी महामंडळ, एसटी कर्मचारी व अधिकारी आर्थिक चक्रव्यूहामध्ये फसत गेले व त्यामुळेच आज महिन्याच्या दहा तारखेला अर्ध्या वेतनाकडे पाहण्याची दुर्दैवी वेळ एसटीच्या कर्मचारी, अधिकाऱ्यांवर आलेली आहे. महिलांना एसटी प्रवास केवळ अर्ध्या तिकिटामध्ये उपलब्ध करून दिलेला आहे. यामुळे महिला प्रवासीरूपी मतदार राज्य सरकारमधील सत्ताधाऱ्यांवर खूश झालेला आहे. तथापि या अर्ध्या तिकिटामुळे एसटी महामंडळाचे दर महिन्याला किती लाखांचे नुकसान होणार आहे, याचा विचार ना राज्य सरकारने कधी केला आहे, ना अर्ध्या तिकिटामध्ये प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांनी केला आहे. याशिवाय ७५ वर्षे वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास राज्य सरकारने उपलब्ध करून दिलेला आहे. पण या मोफत प्रवासासाठी राज्य सरकारने एसटीला आर्थिक मदत करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक होते; परंतु येथे राज्य सरकारने उदासीनतेचे धोरण अवलंबत काढता पाय घेण्याची भूमिका घेतलेली आहे. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'साठी राज्य सरकारने दर महिन्याला करोडो रुपयांचा निधी उपलब्ध होत आहे. दर महिन्याला लाडक्या बहिणींच्या खात्यामध्ये न मागताही १५०० हजार रुपये जमा होत आहेत. निवडणूक काळात तर लाडक्या बहिणींच्या खात्यात २१०० रुपये जमा करण्याचे आश्वासनरूपी घोषणाही करण्यात आली होती. लाडक्या बहिणींना निधी देण्याची तजवीज राज्य सरकारकडून दर महिन्याला करण्यात येत आहे, मात्र दररोज लाखो रुपयांचे प्रवासी उत्पन्न राज्य सरकारला मिळवून देणाऱ्या एसटीच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या वेतनासाठी तजवीज करण्यासाठी राज्य सरकारकडून कोणत्याही महिन्याला स्वारस्य दाखविले जात नाही. आज एसटी कर्मचाऱ्यांची अवस्था 'रोज मरे, त्याला कोण रडे' अशा स्वरूपाची झालेली आहे. गेली अनेक महिने आर्थिक समस्येत एसटी कर्मचारी भरडला जात असतानाही या कर्मचाऱ्यांना कोणी वालीच शिल्लक राहिला नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे. एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या आर्थिक दुखण्यावर तोडगा कधी निघणार? याचे उत्तर नजीकच्या काळात सापडले न गेल्यास एसटीचे कर्मचारी पुन्हा संपरूपी आंदोलनाचे हत्यार उगारण्याची भीती आहे.

# 'कॅश फॉर स्कूल' जॉब घोटाळा




ज्येष्ठ विश्लेषक



**अभय गोखले**

पश्चिम बंगालमधील शिक्षक भरती घोटाळा हा अलीकडच्या काळातील सर्वात मोठा घोटाळा मानावा लागेल. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करताना मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आली आणि पश्चिम बंगाल स्कूल सर्व्हिस कमिशनच्या कार्यपद्धतीवर भले मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले. कलकत्ता उच्च न्यायालयाने २५७५३ शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द केल्यानंतर देशभरात खळबळ माजली. आता सर्वोच्च न्यायालयाने त्यावर शिक्कामोर्तब केल्याने ते सर्व कर्मचारी आता हवालदिल झाले आहेत.

२०१६ साली पश्चिम बंगालमध्ये सरकारी आणि सरकारकडून अनुदानित शाळांसाठी शिक्षक भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र त्याकरिता जी परीक्षा घेण्यात आली त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार आढळून आल्याने त्या विरोधात मेरिटमध्ये आलेल्या, परंतु निवड न झालेल्या परीक्षार्थींनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या. परीक्षेत कमी गुण मिळालेल्या बऱ्याच उमेदवारांना लाच स्वीकारून आणि वशिलेबाजीने नोकऱ्या प्रदान करण्यात आल्या. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या उमेदवारांनी उत्तरपत्रिका कोऱ्या सोडल्या होत्या, त्यातील काही जणांना लाच घेऊन नोकऱ्या प्रदान करण्यात आल्या होत्या. एवढेच नव्हे तर काही उमेदवार असे होते की, ते परीक्षेला बसलेही नव्हते, त्यांच्यापैकी काही जणांना वशिलेबाजीच्या जोरावर आणि पैशांच्या मोबदल्यात शिक्षकाची नोकरी प्रदान करण्यात आली होती. भरतीसाठी जी लेखी चाचणी घेण्यात आली, ती ऑप्टिकल मार्क रेकगनिशन (OMR) शिट्सवर घेण्यात आली. मात्र स्कूल सर्व्हिस कमिशनने स्कॅनिंग केल्यानंतर वर्षभराने ओरिजिनल ओएमआर शिट्स नष्ट केल्याने महत्त्वाचा पुरावा नाहीसा झाला. त्याच्या ज्या डिजिटल कॉपीज होत्या त्या स्कूल सर्व्हिस कमिशनच्या सर्व्हरमधून गायब झाल्याचे, सीबीआयने केलेल्या तपासात उघडकीस आले, त्यामुळे संशय अधिकच गडद झाला.

शिक्षक भरतीमध्ये ज्या नियुक्त्या करण्यात आल्या, त्यातील जवळपास ८ हजार नियुक्त्या या संशयास्पद असल्याची माहिती समोर आली आहे. आपली शिक्षकपदी नियुक्ती व्हावी म्हणून काही कमी गुण मिळालेल्या उमेदवारांनी पाच ते पंधरा लाख रुपयांची लाच दिल्याचे बोलले जात आहे.

या घोटाळ्या विरोधातील याचिकांवर निर्णय देताना २२ एप्रिल २०२४ रोजी कलकत्ता उच्च न्यायालयाने २५७५३ शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द ठरविल्या. दुर्दैवाने भरती प्रक्रियेत जे उमेदवार मेरीटच्या जोरावर शिक्षक म्हणून नियुक्त झाले होते त्यांनाही न्यायालयाच्या निकालानुसार आपली नोकरी गमवावी लागली.

उच्च न्यायालयाच्या या निकालाविरोधात पश्चिम बंगाल सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. सुरुवातीला सर्वोच्च न्यायालयाने, कलकत्ता उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती दिली, मात्र सीबीआयला चौकशी पुढे चालू ठेवण्यास अनुमती दिली. त्यानंतर त्याबाबत सर्वोच्च न्यायालयात विस्तृत सुनावणी झाल्यावर, ३ एप्रिल २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने कलकत्ता उच्च न्यायालयाचा निकाल उचलून धरला.

सर्वोच्च न्यायालयाने असाही आदेश दिला की भरतीची प्रक्रिया तीन महिन्यांच्या आत नव्याने सुरू करण्यात यावी. महत्त्वाचे म्हणजे हा शिक्षक भरती घोटाळा ज्या काळात झाला त्यावेळी पार्थ चटर्जी हे पश्चिम बंगालचे शिक्षण मंत्री होते. या घोटाळ्या संदर्भात इडीने चटर्जी यांच्या सहकाऱ्याच्या घरावर घातलेल्या छाप्यामध्ये ५१ कोटी रुपये रोख सापडले होते. त्यामुळे देशभर खळबळ माजली होती. एवढी प्रचंड रक्कम मोजण्यासाठी कॅश काउंटिंग मशिन्स आणावी लागली होती. तसेच ती कॅश नेण्यासाठी ट्रक मागवावे लागले होते. त्यानंतर पार्थ चटर्जी यांना जुलै २०२२ मध्ये अटक करण्यात आली होती. कॅश फॉर स्कूल जॉब प्रकरणी पश्चिम बंगाल प्राथमिक शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष आणि सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचे आमदार माणिक भट्टाचार्य यांना ऑक्टोबर २०२२ मध्ये अटक करण्यात आली.

२५,७५३ एवढ्या मोठ्या प्रमाणात झालेल्या शिक्षकांच्या नियुक्त्या न्यायालयाने रद्द केल्यामुळे, त्यांचा भविष्यकाळ अंधःकारमय झाला आहे. एवढ्या मोठ्या शिक्षक भरती घोटाळ्यामुळे पश्चिम बंगालचे नाव बदनाम झाल्यानंतरही, राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्यापासून धडा घेतलेला दिसत नाही. त्यांची भाषा नेहमीप्रमाणे आक्रमक आहे. त्यांनी न्यायालयाचा निकाल स्वीकारण्यास नकार दिला आहे. शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करण्याऐवजी त्यांच्या बदल्या केल्या असत्या तर ते जास्त सयुक्तिक ठरले असते, अशी हास्यास्पद प्रतिक्रिया ममतांनी नोंदवली आहे. या घोटाळ्याची जबाबदारी मुख्यमंत्री या नात्याने स्वीकारून, खरे तर ममतांनी नोकरी गमावलेल्या शिक्षकांची माफी मागायला हवी होती; परंतु तसे न करता त्यांनी या सर्व प्रकरणाचा ठपका भाजपा आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट या पक्षांवर ठेवला आहे. भाजपा आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट हे पक्ष पश्चिम बंगालमधील शिक्षण व्यवस्था अस्थिर करू पाहत आहेत, असा आरोप ममतांनी वरील दोन पक्षांवर लावला आहे. त्यांनी सांगितले की, नियुक्त्या रद्द करण्यात आलेल्या शिक्षकांपैकी अकरा हजार शिक्षक हे नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना शिकवत होते, तर पाच हजार सहाशे शिक्षक हे अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना शिकवत होते. त्यातील बरेचसे शिक्षक हे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षांचे पेपर तपासत होते. आता एवढ्या मोठ्या प्रमाणात शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द झाल्यानंतर विद्यार्थ्यांना कोण शिकवणार असा प्रश्न ममतांनी विचारला आहे.

पश्चिम बंगालमधील शिक्षण व्यवस्था न्यायालयाच्या या निर्णयामुळे जवळजवळ कोसळून पडली आहे. हजारो युवकांचे करिअर बरबाद झाले आहे. शिक्षक भरतीची प्रक्रिया नव्याने सुरू करण्यात येईल तेव्हा ती प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी बराच अवधी लागू शकेल. अशा परिस्थितीत शिक्षकांचा तुटवडा भासेल आणि शाळांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागेल.

# ज्येष्ठ नागरिक सायबरच्या विळख्यात...





**वृषाली आठल्ये**

मुंबई ग्राहक पंचायत

७५ वर्षांच्या एका निवृत्त कर्नल यांना एका सायबर गुन्हेगारांनी तीन कोटी रुपयाला फसवल्याची एक बातमी नुकतीच वाचनात आली. त्या लोकांनी त्यांना कमी पैशात जास्तीचे पैसे कमवायचे आमिष दाखवून फसवले. प्रथम त्यांना काही पैसे मिळाल्याचे दिसले, त्यामुळे कर्नलनी आणखी पैसे गुंतवले. जवळजवळ आयुष्यभराची कमाई म्हणा ना! खात्यावर फायदा दिसत असूनही तो काढता येत नव्हता शिवाय गुंतवलेली मुद्दलही गेली. अशा बातम्या आजकाल आपण नेहमीच वाचतो. हे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. या गुन्हेगारांचे सोप्पे सावज हे ज्येष्ठ नागरिक असतात.

आजकाल आपण ऑनलाइन खरेदी, तसेच बँकेचे व्यवहार सगळंच ऑनलाइन करतो तसेच आपण सोशल मीडिया पण सतत वापरत असतो. प्रत्येक गोष्टीचे जसे चांगले परिणाम असतात, तसे वाईटही परिणाम असतात. ते म्हणजे सायबर गुन्हेगारी! या फसव्या लोकांनी नवीन नवीन युक्त्या शोधल्या आहेत. त्या वापरून विविध प्रकारांनी ते ग्राहकांना फसवत असतात. बहुतेकदा यामध्ये अडकणारे ज्येष्ठ नागरिक असतात. २०२४ मध्ये मुंबई येथील सगळ्यात मोठा सायबर गुन्हा एका ज्येष्ठ नागरिकांबरोबर झाला. त्या माणसांनी कमी पैसे गुंतवून दुपट्ट पैसे मिळतील, म्हणून वेगवेगळ्या खात्यात पैसे टाकून शेअर मार्केटमध्ये गुंतवले पण त्यांना दुप्पट पैसे तर सोडाच पण त्यांनी गुंतविलेले पैसे देखील परत आले नाहीत. त्यांचे एकूण ११ कोटी रुपये गेले.

दर महिन्याला आपण आपली विजेची बिले ऑनलाइन भरतो किंवा NACH ने आपल्या खात्यातून कट करायला सांगतो. पण रात्री किंवा संध्याकाळी कॉल येतो की आताच्या आता विजेचे बिल भरा. आज शेवटचा दिवस आहे, यटा नंबर वर पैसे पाठवा नाहीतर वीज कापली जाईल. आपण घाबरून जातो आणि पैसे भरतो आणि नंतर बँकेचे पासबुक तपासल्यानंतर लक्षात येत की, आपले बिल भरलेले होते. यासाठीच बँकेतील व्यवहारांवर सतत लक्ष ठेवण्याची गरज असते. दुसरा प्रकार म्हणजे अनोळखी नंबरवरून कॉल येतो तुमच्या नातेवाइकाचा अपघात झाला आहे. ते हॉस्पिटलमध्ये आहेत. अमुक एका नंबरवर पैसे पाठवा. आपलाच नातेवाईक, हॉस्पिटल ऐकले की आपण घाबरतो आणि समोरच्यावर विश्वास ठेऊन पैसे पाठवतो. ती बातमी खरी आहे किंवा नाही याची खातरजमा करत नाही.

हल्लीच एक फसवण्याचा भयानक प्रकार आला आहे. डिजिटल अटक! एक घटना अशी घडली. मुंबईतील एका महिलेला एक कॉल आला की, तिच्या नावाने एक पार्सल तैवानला पाठवण्यात आले आहे आणि त्यात ड्रग्स आणि इतर काही महागडे सामान आहे. एवढेच नाही तर तिची केस एका पोलीस अधिकाऱ्याकडे दिली आहे. तिला डिजिटल अटक केली गेली आहे. सुरुवातीला तिला पंधरा लाख रुपये पाठवायला सांगितले, जेणेकरून ते तिचं बँक अकाऊंट व्हेरिफाय करू शकतील आणि थोड्या वेळाने तिला तिचे पैसे परत करून तिचा विश्वास मिळवला. त्यानंतर तिला परत वेगळ्या अकाऊंटमध्ये परत पैसे टाकायला सांगितले. असा करता करता त्या बाईने स्वतःच्याच नाही तर तिच्या नवऱ्याच्या अकाऊंटमधूनही तब्बल ३.८ कोटी रुपये ६ वेगवेगळ्या बँक अकाऊंटमध्ये पाठवले. हे सगळं चालू असताना तिला भीतीही घातली गेली की, आमच्या अटकेत असल्याने कोणालाही काही सांगायचे नाही. आम्ही तुझ्यावर लक्ष ठेऊन आहोत. जेव्हा तिचे पैसे परत आले नाहीत तेव्हा मात्र तिला संशय आला आणि तिने आपल्या मुलीला सगळी हकीकत सांगितली. सगळं ऐकताच तिच्या मुलीने ती फसवली गेल्याचे सांगितले आणि त्यामुळे पोलिसांकडे जाण्याचा सल्ला दिला.

आधी म्हटल्याप्रमाणे फसवाफसवीच्या प्रकरणात जास्त करून ज्येष्ठ नागरिक अडकतात. त्याची कारणे अनेक आहेत. उतारवयात त्यांच्या हातात कॉम्प्युटर किंवा स्मार्ट फोन आले आहेत. जुजबी ज्ञानावर ते यावर काम करत असतात. त्याना तांत्रिक गोष्टींची माहिती नसते, तसेच त्यांना या वयात तंत्रज्ञान शिकणं अवघड जात. दुसरं कारण म्हणजे हे लोक एकटे असल्यामुळे कोणीही त्यांच्याशी थोडे जरी गोड बोलले किंवा मदत देऊ केली की ज्येष्ठ नागरिक त्यांना आपली सगळी गोपनीय माहिती सहजपणे देऊन टाकतात. शिवाय वयोमानानुसार होणारे विस्मरण याचाही फायदा लोक घेतात. हे नवीन नवीन फसवणुकीचे प्रकार माहीत नसल्यामुळे ते अनोळखी इमेल्स, वेबसाईट किंवा कॉल ओळखू शकत नाहीत. फसवणारे लोक हे ज्येष्ठांना अनेक खोट्यानाट्या गोष्टी सांगून पैसे घेतात.

हा विषय इतका मोठा आहे की, सांगू तितके कमी आहे पण ग्राहकांनी पुढीलप्रमाणे सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.

१) आपल्या मोबाईलला कठीण पासवर्ड ठेवा जो कोणी शोधू शकणार नाही.

२) 'https' अशा संकेत स्थळावरूनच व्यवहार करा. यातील शेवटचा 's' ती वेबसाईट सुरक्षित असल्याचे दर्शवतो.

३) कुठलीही साईट वापरून झाल्यावर आठवणीने लॉग आऊट करा.

४) बँक खाते, ATM / क्रेडिट कार्ड इत्यादीचा पासवर्ड कोणालाही देऊ नये. अगदी बँकेतून बोलतोय असे सांगितले तरी. कारण लक्षात ठेवा की बँक कधीही कॉल करून पासवर्ड विचारात नाही.

५) कुठल्याही भूलथापांना बळी पडू नका. भीती आणि मोह यापासून दूर राहा.

६) तिऱ्हाईत माणसाला सोशल मीडियावर आपले लोकेशन पाठवू नका.

काळजी घेऊनही फसवले गेल्यास १९३० या हेल्पलाईनवर किंवा सायबर सेलच्या वेबसाइटवर https://cybercrime.gov.in वर आपली तक्रार नोंदवा.

**mgpshikshan@gmail.com**

## राशिभविष्य

शुक्रवार, ११ एप्रिल २०२५

### || पंचांग ||

आज मिती चैत्र शुद्ध दशमी शके १९४७. चंद्र नक्षत्र पुष्य. योग दृती. चंद्र राशी कर्क. भारतीय सौर २१ शके १९४७. शुक्रवार, दिनांक ११ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ०६.२४, मुंबईचा चंद्रोदय ०२.०३, मुंबईचा सूर्यास्त ०६.५४, मुंबईचा चंद्रास्त ०३.२६, उद्याची. राहू काळ ०७.५८ ते ०९.३२. दमनक चथुर्दशी, हनुमान जन्मोत्सव उपवास, महात्मा जोतिबा फुले जयंती, पौर्णिमा प्रारंभ- उत्तर रात्री-०३.२१.

### || भविष्य ||

**मेष :** कामानिमित्त प्रवास होण्याची शक्यता.

**वृषभ :** रखडलेल्या कामांमध्ये गतिमानता येईल.

**मिथुन :** मनावरचा ताण नाहीसा होईल.

**कर्क :** व्यवसायनिमित्त प्रवास करावा लागेल.

**सिंह :** व्यवसाय-धंद्यात मोठे फायदे होतील.

**कन्या :** आर्थिक नियोजन करावे लागेल.

**तूळ :** महत्त्वाच्या कामांना गती मिळेल.

**वृश्चिक :** आर्थिक आवक स्थिर राहील.

**धनू :** अनुकूल परिस्थिती राहील.

**मकर :** रोजची कामे विनाविलंब होतील.

**कुंभ :** सर्वसामान्य परिस्थिती राहील.

**मीन :** जीवनसाथीची सर्वतोपरी साथ मिळेल.




## मेट्रो रेल्वे स्थानक नामफलकाबाबत...

प्रभादेवी विभागात मेट्रो कॉर्पोरेशनतर्फे सध्या भूमिगत रेल्वेची कामे सुरू असून लवकरच पूर्णत्वास येतील. सदर मेट्रो रेल्वेचे एक स्थानक प्रभादेवी श्री सिद्धिविनायक मंदिर येथे होणार आहे. या स्थानकाचे नामफलक स्टेशनच्या बाहेर लावण्यात आले असून तो 'आयसीआयसीआय लोम्बार्ड सिद्धिविनायक मेट्रो स्टेशन' अशा आशयाचे आहे. श्री सिद्धिविनायक हे जगभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. सबब सदर रेल्वे स्थानकाचे नाव 'श्री सिद्धिविनायक मंदिर' असे ठेवण्यात यावे, ही तमाम भाविकांची तसेच प्रभादेवी-दादर परिसरातील नागरिकांची भावना आहे. मेट्रो प्रशासनाने ठरविलेले 'आय सीआयसीआय लोम्बार्ड सिद्धिविनायक मेट्रो स्टेशन' हे नाव म्हणजे श्री सिद्धिविनायकाच्या तमाम भाविकांचा अपमान आहे असे वाटते. शिवाय सदर नामफलक हे इंग्रजी भाषेतून लिहिलेले आहे. प्रभादेवी विभाग हा प्रामुख्याने मराठी कुटुंबाचा प्रभाग म्हणून ओळखला जातो आणि अशा मराठी समुदायाच्या प्रभागामध्ये इंग्रजी नामफलक लावणे हा सुद्धा एक प्रकारे प्रभादेवीकरांचा अपमान आहे. तरी संबंधितांनी या प्रकरणी स्वतः लक्ष घालून मेट्रो प्रशासनाशी चर्चा करावी व सदर रेल्वे स्थानकाचे नाव श्री सिद्धिविनायक मंदिर असे करण्यास भाग पाडावे व तसा फलक मराठी भाषेत लिहिण्यास आग्रही भूमिका मांडून मराठी भाषेवर होणारा अन्याय दूर करावा व श्री सिद्धिविनायक भाविकांना दिलासा द्यावा.

– **गणेश काशिनाथ देवकर**, मुंबई

## आता आरोग्य विमा ही गरजेची सेवा

मानवी जीवन इतके अनिश्चित झाले आहे की, कधी कोणाला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हावे लागेल आणि त्याचा खर्च किती येईल याची कसलीच खात्री नाही. पुण्यात नुकत्याच घडलेल्या घटनेनंतर सध्या हॉस्पिटलमधील बिले आणि खर्च हा विषय ऐरणीवर आला आहे. अशी वेळ आल्यावर मग पैशांची जमवाजमव करण्यासाठी आयुष्यमान भारत, महात्मा फुले योजना किंवा मुख्यमंत्री सहाय्यता निधी किंवा ओळखीचे आमदार, नगरसेवक यांना बिल कमी करून घेण्यासाठी विनंत्या करणे, मदतीसाठी सोशल मीडियावर आवाहन करणे, आपल्याकडील सोने गहाण ठेवणे, कर्जाने पैसे घेणे असे प्रयत्न केले जातात. पण प्रत्येकवेळी यात यश मिळेलच याची खात्री नसते आणि प्रसंग पेशंटच्या जीवाशी निगडित असतो. म्हणून सर्व नागरिकांनी आपला आणि आपल्या कुटुंबाचा पुरेशा रकमेचा आरोग्य विमा काढून ठेवणे ही आता काळाची गरज झालेली आहे. अचानक लाखो रुपयांची सोय करायला लागण्यापेक्षा दरवर्षी काही हजारांचा आरोग्य विमा घेणे केव्हाही सोपे आहे.

– **अनिकेत शेटे**, पुणे

## आर्थिक स्थिती का खालावली?

राज्याच्या अर्थखात्याने राज्याची आर्थिक स्थिती खालावल्याने वार्षिक तरतुदींच्या केवळ साठ टक्के निधीच वितरित करण्याचे नवे परिपत्रक जाहीर केले आहे. राज्याच्या विकास रोखण्याची नामुष्की राज्यावर आली आहे. भांडवली खर्चाच्या विकासयोजनांच्या खर्चांमध्ये काटछाट करून सक्तीची बचत करण्याची योजना राज्याला आखावी लागली. सर्व विभागांना वार्षिक खर्चाचे नियोजन करावे लागल्याने अनावश्यक खर्चांना चाप बसेल. कल्याणकारी योजनांनी राज्याच्या तिजोरीवर आणलेला ताण मोठा असल्याने सर्व कल्याणकारी योजना बंद कराव्यात. 'लाडकी बहीण' या योजनेला केलेल्या ३६ हजार कोटी रुपयांच्या तरतुदीतून राज्याच विकास साधता आला असता आणि शंभर टक्के विकास निधीचे वाटप करता आले असते. वाढते कर्ज व व्याजासह परतफेड करणे कठीण जात असल्याने राज्यात मंदी सदृश स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. राज्यातील उद्योग व सेवाक्षेत्राची वाढ मंदावली आहे. राज्य सरकारच्या उत्पन्नाचे मार्ग बंद झाल्याने विकासाला खीळ बसली आहे. विकास निधी कमी करणे व इतर खर्चावर निर्बंध घालून तात्पुरती मलमपट्टी करण्यापेक्षा 'लाडकी बहीण' योजना बंद करुन राज्याचा विकास साधावा.

– **विवेक तवटे**, कळवा, ठाणे

## घरच शासकीय देखरेखीत बांधून द्यावे !

घरकुल लाभार्थ्यांसाठी पाच ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतलाय खरा, निर्णय स्तुत्य आहे याबद्दल वाद नाही, परंतु एवढ्या तुटपुंज्या वाळूत घर तयार होईल का हा खरा प्रश्न आहे. शिवाय चढत्या महागाईत, घर साहित्याचे वाढते दर, बांधकाम कारागीर, मजुरांची मजुरी हे सारं पाहता आवास योजनेतून मिळणारे मंजूर अनुदान इतके अल्प ठरते की कितीही ओढून-ताणून घर बसविण्याचा प्रयत्न केला तरी अपुऱ्या अनुदानामुळे लाभार्थ्यांचे घराचे काम काहीतरी अपूर्ण राहते, साहजिकच त्या गरिबाला घर पूर्ण न झाल्याचा मनस्ताप तर होतोच, त्याची केविलवाणी परिस्थिती होते आणि आनंदाऐवजी विवंचना मात्र सतावत राहाते. म्हणूनच एक तर लाभार्थ्यांना योजनेअंतर्गत शासनस्तरावर परिपूर्ण घरंच तयार करून त्यांच्या स्वाधीन केल्यास लाभधारकास विवंचना, चिंता, काळजी राहणार नाही अथवा आजच्या महागाईनुसार, घर साहित्याचा बाजारभाव विचारात घेऊन निदान अनुदानात वाढ करण्यात आल्यास ते त्याला सुसह्य होईल. परिपूर्ण झालेल्या घराचे समाधान, आनंद मिळेल अशी अपेक्षा.

– **विश्वनाथ पंडित**, ठाणे

## मनसेवरील निर्बंध घालण्याची मागणी अयोग्य

मनसे या राजकीय पक्षाने देखील मराठी हा जिव्हाळाचा विषय घेऊन राजकारण करण्याचा प्रयत्न कसोशीने केला. गुढीपाडव्याला मराठी भाषेचा वापर बँका व इतरही ठिकाणी किती केला जातो याची तपासणी करायला राजसाहेबांनी आदेश दिला होता आणि मनसैनिकांनी नेहमीच्या त्यांच्या खास पद्धतीने तपासणी केली होती. जी राज्यातील काही बिगर मराठी नेत्यांना मुळीच आवडली नाही. पण लोकशाही असल्याने आणि मराठी ही राज्याची राजभाषा असल्यामुळे महाराष्ट्रात मराठी भाषाचा आग्रह करणे चुकीचे नाही. म्हणूनच मनसेवर लागलीच निर्बंध घालण्याची केलेली मागणी चुकीचे व अयोग्य वाटत आहे.

– **संजय साळगांवकर**, कुर्ला

# पाणी टंचाईपासून मुंबईकरांची मुक्तता

## सध्या सर्व धरणांमध्ये एकूण ३२ टक्के पाणीसाठा

◆ **मुंबई (खास प्रतिनिधी):**

मुंबईकरांना पुरवठा होणाऱ्या जलसाठ्यांमध्ये सध्या केवळ ३२ टक्के एवढाच पाणीसाठा शिल्लक असल्याने पाणीकपातीचा सामना करावा लागेल अशाप्रकारचे चित्र निर्माण केले जात आहे. मात्र, प्रत्यक्षात मुंबईकरांवर कोणत्याही प्रकारे पाणीकपाती लादली जावू नये यासाठी महापालिका आयुक्त डॉ. भूषण गगराणी हे प्रयत्नशीर आहेत. त्यामुळे सध्याच्या तलावातील पाणीसाठ्याच्या तुलनेत उर्ध्व वैतरणा आणि भातसामधील राखीव साठ्यातील पाणी मुंबई महापालिकेला देण्यासाठी प्रशासनाकडून मागणी करण्यात आलेली आहे. ही मागणी तत्त्वतः मान्य करण्यात आल्याने भविष्यात उर्ध्व वैतरणा आणि भातसामधील राखीव कोट्यातील जलसाठा उपलब्ध होणार असल्याने भविष्यात मुंबईकरांवर कोणत्याही प्रकारची कपात लादण्याची वेळ येणार नाही अशा प्रकारचा विश्वास जलअभियंता विभागाच्या वतीने व्यक्त केला जात आहे.



मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या अप्पर वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या धरण तथा तलावांमधून दैनंदिन ३८५० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केला जात आहे. सध्या या सर्व धरण तथा तलावांमध्ये वर्षभराच्या एकूण १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर पाण्याच्या तुलनेत सध्या ४ लाख ७० हजार दशलक्ष लिटर एवढा पाणीसाठा उपलब्ध आहे. हा पाणीसाठा सुमारे ३२ टक्के एवढा आहे तर मागील वर्षी याच तारखेपर्यंत सुमारे २७ टक्के एवढा पाणी साठा होता. मागील वर्षी याच कालावधीमध्ये ३ लाख ९० हजार ४०० दशलक्ष लिटर एवढा पाणीसाठा होता. त्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत यंदा पाणीसाठा त्याप्रमाणे पाच टक्के अधिक असल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे.


# कॉँक्रिटीकरणासाठी रेडी मिक्स कॉँक्रीट पुरवठा मजबूत करा

## महापालिका अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांचे निर्देश

◆ **मुंबई (खास प्रतिनिधी):**

मुंबईत सुरू असलेल्या रस्ते कॉँक्रिटीकरण कामांचा वेग वाढण्याच्या दृष्टीने रेडी मिक्स कॉँक्रिटची पुरवठा साखळी (सप्लाय चेन) अधिक मजबूत करून त्यासाठी प्रकल्प चालक आणि रस्ते कामांचे कंत्राटदार यांनी आपापसात समन्वयाने त्वरित कार्यवाही करावी. तसेच, एफ उत्तर विभागात बहुतांशी पदपथांखाली जलवाहिन्या आहेत. ही बाब लक्षात घेता ज्या रस्त्यांचे कॉँक्रिटीकरण व सोबत पदपथाची कामे ३१ मे २०२५ पूर्वी पूर्ण होणार असेल, तेवढ्याच लांब अंतराच्या जलवाहिन्या अंथरण्यात याव्यात. जेणेकरून नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी दिल्या.

मुंबईकरांच्या सुलभ आणि जलद प्रवासासाठी मुंबई शहर विभागात रस्ते सिमेंट कॉँक्रिटीकरणाची कामे अहोरात्र व वेगाने सुरू आहेत. रस्ते कॉँक्रिटीकरण अंतर्गत शीव (पूर्व) येथील रस्ता क्रमांक २७ वरील कॉँक्रिटीकरण कामाची अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी बुधवारी ८ एप्रिल २०२५



रोजी रात्री उशिरा प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर वांद्रे-कुर्ला संकुलातील मीलन रोड बिल्टेक एलएलपी या रेडी मिक्स कॉँक्रिट (आरएमसी) प्रकल्पाला देखील बांगर यांनी आकस्मिक भेट दिली. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सिमेंट कॉँक्रिट रस्त्यांची सुरू असलेली कामे ३१ मे २०२५ पूर्वी पूर्ण व्हायला हवीत, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. या कामांची सद्यस्थिती पाहण्यासाठी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) बांगर हे मुंबई शहरासह पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरांमध्ये सुरू असलेल्या रस्ते कामांना प्रत्यक्ष भेट देत आहेत. तसेच, भारतीय तंत्रज्ञान संस्थेचा (आय. आय. टी. मुंबई) चमू, गुणवत्ता देखरेख संस्थेचे (क्यू. एम.ए.) प्रतिनिधी या दौऱ्यांमध्ये सोबत असतात.

याचाच एक भाग म्हणून काल एफ उत्तर विभागात शीव (सायन) (पूर्व) परिसरात पाहणी दौरा आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्याप्रसंगी रस्ते कॉँक्रिटीकरण कसे केले जात आहे, त्याचे संपूर्ण प्रात्यक्षिक बांगर यांनी पाहिले. कॉँक्रिटीकरण सुरू होण्यापूर्वी केलेली पायाभरणीची कामेही त्यांनी बारकाईने पाहिली. तसेच संबंधित अभियंत्यांकडून कार्यवाहीचा सविस्तर तपशील जाणून घेतला. एफ उत्तर विभागात बहुतांश ठिकाणी जलवाहिन्या या पदपथांखाली असल्यामुळे प्रत्यक्ष वाहतूक मार्ग (कॅरेज वे) कामात अडथळा येत नाही, अशी माहिती संबंधितांनी दिली.

असे असले तरी जे रस्ते व पदपथ ३१ मे २०२५ पूर्वी पूर्ण होणार असतील तेवढ्याच लांबीच्या जलवाहिन्या अंथरण्यात याव्यात. यासाठी जलअभियंता विभागाशी योग्य तो समन्वय साधावा. कोणत्याही स्थितीत संबंधित रस्ते व पदपथ हे ३१ मे २०२५ पूर्वी गुणवत्ता राखून पूर्ण होणे आवश्यक आहे, अशा सूचनाही बांगर यांनी दिल्या. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय. आय. टी. मुंबई) चे सहयोगी प्राध्यापक सोलोमन देबबर्मा, उपप्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) (शहर विभाग) अंकुश जगदाळे यांच्यासह संबंधित अधिकारी आदी या पाहणी दौऱ्याप्रसंगी उपस्थित होते.

# ह ू ५० टक्क्यांनी घट



◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

हवामान बदल, नैसर्गिक आपत्तींमुळे कोकणातील हापूस आंब्यांच्या उत्पादनात तब्बल ५० टक्क्यांनी घट झाली आहे. पहिल्या आणि तिसऱ्या टप्प्यात आलेला मोहोर वाया गेला आहे. सध्या दुसऱ्या टप्प्यातील मोहोरापासून तयार झालेले आंबे बाजारात आहेत. एप्रिलअखेर हापूसची आवक चांगली राहील. पण, मे महिन्यात आवक आणि बाजारातील उपलब्धता कमी होणार आहे. आंब्याला तीन टप्प्यात मोहोर येतो. पहिल्या टप्प्यात नोव्हेंबरमधील थंडीत मोठ्या प्रमाणावर मोहोर येतो. यंदा अपेक्षित थंडी पडली नाही. त्यात नर फुलांचे प्रमाण वाढल्यामुळे फळधारणा झाली नाही. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील मोहोर पूर्णतः वाया गेला. डिसेंबरमध्ये दुसऱ्या टप्प्यातील मोहोर आला. आता मिळणारे आंबे डिसेंबरमधील मोहोरपासून मिळत आहेत. जानेवारीमध्ये येणाऱ्या तिसरा टप्पातील मोहोर वाढलेल्या तापमानामुळे वाया गेला आहे. जानेवारीतील मोहोरापासून मे महिन्यात आंबा मिळतो. त्यामुळे यंदा मे महिन्यात बाजारात कोकणातील हापूसची आवक कमी राहील. बाजारातील उपलब्धता कमी होऊन दरवाढ होऊ शकते, अशी माहिती सिंधुदुर्ग जिल्हा फळबागातदार संघाचे सदस्य विलास ठाकूर यांनी दिली.

नोव्हेंबर महिन्यात चांगला मोहोर येण्यासाठी ऑक्टोबर महिन्यापासून पाऊस न पडणे आणि नोव्हेबरमध्ये चांगली थंडी गरजेचे असते. यंदा नोव्हेबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पाऊस पडत राहिला. थंडीही अपेक्षित पडली नाही. त्यामुळे मोहोर येण्यासाठी पोषक हवामान मिळा नाही. मोहोर येण्याच्या काळ झाडांना पालवी फुटली. त्यानंतर तापमान वाढ झाली. रात्रीच्या आ दिवसांतील तापमानात १५ अं सेल्सिअसहून जास्त फरक राहिल त्यामुळे लहान फळे करपून गळ पडली. अवकाळी पावसामु फळांवर काळे डाग पडत आ फळमाशीचा प्रार्दुभाव वाढून आंब्या नुकसान वाढले आहे. एप्रिलच पहिल्या आठवड्यात तापम वाढल्यामुळे आंबे कमी दिवस पक्व होऊन काढणीला आले आहे त्यामुळे बाजारात हापूसची आव वाढली आहे. यंदा कोकणात हापूस उत्पादन सरासरीच्या जेमतेम ३० ३५ टक्केच होईल, अशी माहि कोकण हापूस उत्पादक आ विक्रेता संघाचे अध्यक्ष विवेक भि यांनी दिली.

**सध्या १००० ते ३००० पेटीचा दर आहे**

मुंबई बाजार समितीत कोकणातून गुरुवारी ७५ हजार पेटी हापूसची आवक झाली. सध्या १००० ते ३००० पेटीचा दर आहे. फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांत आंबाची आवक सरासरीपेक्षा कमी राहिली. एप्रिलमध्ये सरासरी इतकी आवक राहील. मे महिन्यात फारशी आवक होणार नाही. गुजरातमध्येही आंबा उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे मे महिन्यात दर चढे राहतील, अशी माहिती मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील फळ व्यापारी संजय पानसरे यांनी दिली.

## वेचक

### लाखो नागरिक करतात गुडघे प्रत्यारोपण

**मुंबई :** मुंबईतील ज्येष्ठ अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. विविध माकवाना यांनी एका आर्थिक वर्षात एकूण ५८२ टोटल नी रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत, यामध्ये ३६३ रोबोटिक सहाय्यक गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया मेरील कंपनीच्या अत्याधुनिक कुविस जॉईंट रोबोटिक सिस्टिमद्वारे केल्या गेल्या. ही कामगिरी अस्थिरोग उपचारांमध्ये अचूकता, कार्यक्षमता आणि रुग्णांच्या उत्कृष्ट परिणामांसाठी एक नवा मानदंड ठरली आहे. २० वर्षांहून अधिक अनुभव असलेले डॉ. माकवाना हे सतत नव्या पद्धती आणि तंत्रज्ञानाचा वापर करून शस्त्रक्रिया अधिक परिणामकारक करण्याच्या दिशेने काम करत आहेत. रोबोटिक-आधारित तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांच्या शस्त्रक्रियांमध्ये अचूकता वाढली असून, रुग्णांचा रिकव्हरी कालावधी कमी झाला आहे, वेदना कमी झाल्या आहेत आणि दीर्घकालीन कार्यक्षमतेतही सुधारणा झाली आहे. या यशाबद्दल बोलताना ॲपेक्स सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल्सचे अस्थिरोग व शल्यविशारद तज्ज्ञ डॉ. विविध मकवाना म्हणाले, "कुवीस जॉइंट रोबोटिकनी रिप्लेसमेंट प्रणालीमुळे शस्त्रक्रियेत अत्यंत अचूकता आणि पारदर्शकता मिळते. विशेषतः वृद्ध आणि संधिवात असलेल्या रुग्णांसाठी ही प्रणाली खूप फायदेशीर ठरते. या तंत्रज्ञानामुळे हाडांचे अत्यंत अचूक कटिंग होते, त्यामुळे ऊतींचे नुकसान कमी होते, रक्तस्राव कमी होतो आणि रुग्ण लवकर बरे होतात. ॲपेक्स हॉस्पिटलमध्ये आम्ही दर्जेदार ऑर्थोपेडिक सेवा देण्यास कटिबद्ध आहोत, जेणेकरून रुग्णांना पुन्हा चालता येईल आणि वेदनामुक्त जीवन जगता येईल."

### 'नालेसफाईच्या कार्यपद्धतीत सुधारणा करा'

**मुंबई :** मुंबई महानगरात पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून नदी-नाल्यांमधून गाळ काढण्याची कामे दरवर्षाप्रमाणे सुरू आहेत. तथापि, गाळ उपशाच्या पलीकडे जाऊन पावसाळ्यातील संभाव्य पूरस्थिती रोखणे, हा नाले स्वच्छता करण्याचा प्राधान्याने उद्देश असला पाहिजे. ही बाब लक्षात घेऊन प्रचलित कार्यपद्धतीमध्ये योग्य ती सुधारणा करावी, अशा स्पष्ट सूचना अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिल्या. मुंबई महानगरपालिकेकडून नाल्यांमधून गाळ उपसा करण्याची कामे वेगाने सुरू आहेत. या अनुषंगाने पूर्व उपनगरांमधील प्रमुख नाल्यांमधून गाळ काढण्याच्या कामांची तसेच मिठी नदीतील गाळ काढण्याच्या कामांची अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी पाहणी केली. त्यावेळी त्यांनी संबंधितांना विविध निर्देश दिले. सर्व प्रमुख नाल्यांच्या बाबतीत गाळ उपसा करण्याचे नालेनिहाय दिवसनिहाय नियोजन करावे. सर्व संबंधित अभियंत्यांनी फक्त कार्यालयात आढावा न घेता, प्रत्यक्ष कार्यस्थळी दररोज उपस्थित राहून गाळ उपसा कामांवर योग्य देखरेख करावी, अशाही सूचना बांगर यांनी दिल्या आहेत.

# सलमान मेंटल हॉस्पिटलचा डॉक्टर म्हणत 'बिग बॉस'ला कामराचा स्पष्ट नकार

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने 'बिग बॉस' रिॲलिटी शोची ऑफर नाकारली आहे. यावर कामराने 'हे एक मनोरुग्णालय आहे, जिथला डॉक्टर म्हणजेच सलमान खान आहे', असे त्याने त्याच्या सोशल मीडिया एक्स अकाऊंटवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. कामराच्या या पोस्टची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाण्यातून टीका केल्यानंतर स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. कॉमेडियन कुणाल कामराच्या वादाच्या पार्श्वभूमीवर त्याला 'बिग बॉस' या रिॲलिटी शोचा भाग व्हायला आवडेल का असे कास्टिंग डायरेक्टरने अलीकडेच



त्याला विचारले. यावर कामराने उत्तर दिले, मेंटल हॉस्पिटलमध्ये जाणं पसंत करेन', असे म्हटले आहे. कामरा याने एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'बिग बॉस हे एक मानसिक रुग्णालय आहे, जिथे डॉक्टर म्हणजेच सलमान आठवड्यातून दोन दिवस रुग्णांना भेटण्यासाठी येतो'. या वाक्यासोबत कामराने स्मायली फेसदेखील शेअर केल्या आहेत. बिग बॉस हा भारतातील बिग बॉस फ्रँचायझीचा एक भारतीय हिंदी भाषेतील रिॲलिटी टेलिव्हिजन शो आहे, जो कलर्स टीव्हीवर प्रसारित होतो. हे एन्डेमोलने विकसित केलेल्या बिग ब्रदरच्या डच स्वरूपावर आधारित आहे. ३ नोव्हेंबर २००६ रोजी प्रीमियर झाल्यापासून, शोने अठरा सीझन आणि तीन ओटीटी सीझन पूर्ण केले. आता येणारा १९वा सीझन आहे.

# परीक्षेच्या बनावट वेळापत्रकापासून सावधान

## मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थ्यांना आवाहन!

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबई विद्यापीठाच्या पाच वर्षीय विधि शाखेच्या (बीएलएस/एलएलबी) १० व्या सत्र परीक्षेचे एक बनावट वेळापत्रक तयार करून समाजमाध्यमांसह इतर माध्यमांवर फिरत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या वेळापत्रकात आगामी परीक्षांच्या तारखांमध्ये फेरबदल दर्शविण्यात आले आहेत. मात्र हे मुंबई विद्यापीठाचे अधिकृत वेळापत्रक नसून गैरसमज निर्माण करण्याच्या उद्देशाने तयार केलेले आहे, असे मुंबई विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले. तसेच, या प्रकरणाची मुंबई विद्यापीठ प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून अधिक तपास करण्यात येत आहे.

हे वेळापत्रक बनावट असल्याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घेऊन मुंबई विद्यापीठाच्या http://www.mu.ac.in या अधिकृत संकेतस्थळावरील वेळापत्रकावर विश्वास ठेवावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. पूजा रौंदळे यांनी केले आहे, तसेच



बनावट वेळापत्रकाबाबत अधिक माहिती मिळाल्यास तत्काळ संबंधित प्रशासनाला कळवावे, जेणेकरून या गैरप्रकाराला वेळीच थांबवता येईल, असेही डॉ. पूजा रौंदळे यांनी सांगितले.मुंबई विद्यापीठाच्या अधिकृत वेळापत्रकाप्रमाणे पाच वर्षीय विधि शाखेच्या (बीएलएस/एलएलबी) १० व्या सत्राची परीक्षा ही बुधवार, १६ एप्रिल २०२५ ते सोमवार, ५ मे २०२५ या नियोजित कालावधीत घेतली जाणार आहे. त्यामुळे कोणत्याही माहितीची खात्री करण्यासाठी कृपया अधिकृत माध्यमांचा वापर करा आणि समाज माध्यमांसह इतर माध्यमांवर फिरणाऱ्या कोणत्याही अनधिकृत माहितीवर विश्वास ठेवू नये, असे मुंबई विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



मुंबईतील माझगाव येथे महावीर जयंतीनिमित्त जैन समाजातील लोकांनी मिरवणूक काढली. (छाया : अरुण पाटील)

# प्रभादेवीचा पूल २ वर्षांसाठी बंद; वाहतूक मार्गात मोठे बदल

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबईतील परेल आणि प्रभादेवी परिसरास पूर्व-पश्चिमेस जोडणारा एलफिन्स्टन ब्रिज हा पाडला जाणार आहे. हा ब्रिज पाडून त्याच्या जागेवर नवीन ब्रिज बांधण्यात येणार आहे. नवा ब्रिज बांधण्यासाठी साधारणतः दोन वर्षांचा कालावधी लागणार आहे आणि त्यामुळे वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल होणार आहेत. वाहतूक व्यवस्थापनाबाबत अधिसूचनेचा मसुदा मुंबई पोलिसांच्या वाहतूक विभागाने तयार केला आहे. त्या बदलाच्या संदर्भात वाहतूक पोलिसांनी नागरिकांच्य काही हरकती आणि सूचना असल्यास मागवल्या आहेत.

परेल आणि प्रभादेवी परिसरास पूर्व-पश्चिमेस जोडणारा एलफिन्स्टन ब्रिज हा मुंबई महानगर विकास प्राधिकरण विभागामार्फत तोडून नवीन एलफिन्स्टन उड्डाणपूल, शिवडी वरळी एलिव्हेटेड कनेक्टर उड्डाणपुलाचे काम करणार आहे. यासाठी वाहतुकीत बदल करण्यात आले आहे. दादर पश्चिम परिसरात जाणारी वाहतूक ही मडके बुवा चौक येथून उजवे वळण घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडने खोदादाद सर्कल येथून डावे वळण घेवून टिळक ब्रिजमार्गे ईच्छीतस्थळी जातील. प्रभादेवी, वरळी परिसरात जाणारी वाहतूक ही मडके बुवा चौक सरळ घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडने कृष्ण नगर जंक्शन परेल वर्कशॉप सुपारी बाग जंक्शन भारत माता जंक्शन उजवे वळण घेवून महादेव पालव मार्गाने करी रोड रेल्वे ब्रिजवरून शिंगटे मास्तर चौक वरून उजवे वळण घेवून लोअर परेल ब्रिजमार्गे ईच्छीतस्थळी जातील. तर प्रभादेवी आणि वरळी परिसरात जाणारी वाहतूक ही मडके बुवा चौक सरळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड-सरळ कृष्ण नगर जंक्शन परेल वर्कशॉप सुपारी बाग जंक्शन भारत माता जंक्शन संत जगनाडे चौक उजवे वळण घेवून साने गुरूजी मार्गाने चिंचपोकळी रेल्वे ब्रिजवरून कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य चौक वरून उजवे वळण घेवून एन. एम. जोशी मार्गे ईच्छीतस्थळी जातील. सायन, माटुंगाकडून एल्फिन्स्टन ब्रिजमार्गे प्रभादेवी आणि वरळीकडे जाणारी वाहतूक ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरमार्गे खोदादाद सर्कल येथून उजवे वळण घेऊन टिळक ब्रिजमार्गे ईच्छीतस्थळी जातील.

# मध्य रेल्वेने ८७ लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीची रेल्वे मालमत्ता केली जप्त

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मध्य रेल्वेने २०२४-२५ या आर्थिक वर्षात रेल्वे मालमत्ता (बेकायदेशीर ताबा) कायद्याअंतर्गत रेल्वे मालमत्तेची चोरी आणि बेकायदेशीर ताबा रोखण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. वाढीव गस्त, देखरेख आणि लक्ष केंद्रित परिचलनाद्वारे, रेल्वे संरक्षण दलाने (आरपीएफ) रेल्वे मालमत्तेची चोरी आणि बेकायदेशीर ताबा रोखण्यात लक्षणीय यश प्राप्त केले आहे. यंदाच्या वर्षात एकूण ४३० प्रकरणे नोंदवण्यात आली आणि ९७४ गुन्हेगारांना अटक करण्यात आली, तर २०२३-२४ मध्ये ५३४ प्रकरणे नोंदवण्यात आली आणि १ हजार २७२ गुन्हेगारांना अटक करण्यात आली. कठोर दंडात्मक कारवाई केल्यानेच या प्रकरणांमध्ये घट झाल्याने दिसते. तसेच रेल्वे संरक्षण दलाने ८७ लाख ४२ हजार ३८८ किमतीची रेल्वे मालमत्ता यशस्वीरित्या जप्त केली, ज्यामुळे रेल्वेचे मोठे नुकसान होण्याचे टाळले. मुंबई विभाग १७९ गुन्हे दाखल, ३४५ गुन्हेगारांना अटक, २३,७९,६१९ रुपये जप्त,भुसावळ विभाग ७७ गुन्हे, १७१ अटक, ७,४२,७१८ रुपये जप्त,नागपूर विभाग ८४ गुन्हे, २४३ अटक, ३३,०७,९८८ रुपये जप्त,पुणे विभाग ७१ गुन्हे, १५९ अटक, १८,९१,७७१ रुपये जप्त,सोलापूर विभाग, १६ गुन्हे, ५६ अटक, ४,२०,२९२ रुपये जप्त करण्यात आले आहे.

# घाटकोपर-मानखुर्द सुरक्षा कठड्यांना भेगा

## उड्डाणपुलावरील प्रवास असुरक्षित; ६५० कोटींचा चुराडा

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

घाटकोपर-मानखुर्द जोडरस्त्याच्या उड्डाणपुलाला देवनार कचरा भूमीलगतच्या भागात भेगा पडल्याचे निदर्शनास आले असून उड्डाणपुलाच्या दुतर्फा बांधण्यात आलेले सुरक्षा कठडेही कोसळण्याच्या स्थितीत आहेत. ते नागरिकांसाठी असुरक्षित बनले आहेत. सुरक्षा कठड्यांना गेलेले तडे आणि आणि रस्त्यावरील भेगांमुळे स्थानिक रहिवाशांकडून महापालिकेच्या कामकाजाबाबत प्रश्न उभे केले जात आहेत. परिणामी, उड्डाणपुलासाठी खर्च केलेल्या ६५० कोटी रुपयांचा चुराडा झाल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

महानगरपालिका प्रशासनाने ६५० कोटी रुपये खर्च करून घाटकोपर–



मानखुर्द जोडरस्त्यावरील उड्डाणपूल बांधला. सुमारे २.९ किमी लांबीच्या हा रस्ता सुरुवातीपासूनच विविध मुद्द्यांवरून चर्चेत राहिला. संबंधित उड्डाणपुलावर देवनार कचराभूमीच्या भागात नुकतेच भेगा पडल्याचे समोर आल्याने उड्डाणपुलाच्या दर्जाबाबत शंका व्यक्त केली जात आहे. उड्डाणपुलावरून अवजड वाहनांना प्रवेश नसतानाही काहीच वर्षात रस्त्यावर भेगा पडल्या आहेत. उड्डाणपुलाच्या दुतर्फा असलेले सुरक्षा कठडे बाहेरील बाजूस कलले आहेत. त्यांनाही तडे गेल्याने सुरक्षा कठडे कुठल्याही क्षणी कोसळण्या स्थिती निर्माण झाली आहे. उड्डाणपु मार्गावर पालिकेमार्फत मलनिस्सार प्रकल्पाचे काम सुरु असल्याने त भागात खोदकाम करण्यात आ आहे. त्यामुळे उड्डाणपुलाच्या सुर कठड्यांना तडे गेल्याचा अंदा 'गोवंडी न्यू संगम वेल्फेअर संस्थे व्यक्त केला. अवजड वाहतूक हे नसतानाही रस्त्याला भेगा आणि सुर कठड्यांना तडे गेल्यामुळे आश्च केले जात आहे. अवजड वाहनां वजन पेलण्याची या उड्डाणपुला क्षमता नसावी. त्यामुळेच वाहनां प्रवेश दिला जात नाही. सुरुवातीपास बांधकामाच्या निकृष्ट दर्जाची उदाहर समोर आली आहेत. या बांधकाम मोठा घोटाळा झाला आहे, अ आरोप न्यू संगम वेल्फेअर संस्थे अध्यक्ष फैयाज शेख यांनी केला आ

## बेवारस वाहनांची विल्हेवाट लावण्यासाठी केली संस्थांची निवड

# रस्त्यावरील धूळ पडलेली वाहने महापालिका थेट उचलणार

◆ **मुंबई (खास प्रतिनिधी):**

मुंबईत रस्त्यांच्या कडेला अनधिकृत वाहने उभी केली जात असून या वाहनांमुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी आणि अस्वच्छता निर्माण होते. अनेक रस्त्यांवर बेवारसपणे वाहने उभी केली जात असल्याने त्याठिकाणी योग्यप्रकारे स्वच्छता राखता येत नाही. त्यामुळे मुंबई महापालिकेने वाहतूक कोंडीच्या समस्येला आळा घालण्यासाठी व वाहनांची ये-जा आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून रस्त्यावरील बेवारस वाहनांची विल्हेवाट लावण्यासाठी शहर आणि



उपनगरांसाठी प्रत्येकी संस्थांची निवड केली आहे. या संस्थांच्या माध्यमातून आता बेवारस वाहने नोटीस जारी केल्यानंतर ४८ तासांमध्ये उचलण्याची कार्यवाही केली जाणार असून या माध्यमातून मुंबईचे रस्ते स्वच्छ राखण्यासह महापालिकेच्या तिजोरीतही भर पाडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

गेल्या काही वर्षांपासून मुंबईमध्ये वाहनांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. त्यामुळे दिवसभर वाहतूक वाह कोंडी, तसेच आपल्याला इच्छित स्थळी पोहोचण्यास होणारा विलंब, अपघात, ध्वनी व वायु प्रदूषण आदींचेही प्रमाण वाढले आहे. त्यामुळे जुन्या तथा बेवारस वाहनांची विल्हेवाट लावण्याची मोठी समस्या होती. या बेवारस वाहनांची विल्हेवाट लावण्यासाठी स्क्रॅब यार्ड बनवण्यात येणार होते, परंतु याला शासनाने नामंजुरी देत याची विल्हेवाट शासनाच्या अनुसूचीवरील संस्थांकडून निविदा मागवून त्यांची निवड करावी अशाप्रकारची सूचना केली होती. त्यानुसार महापालिकेने मागवलेल्या निविदेत शहर आणि दोन्ही उपनगरांसाठी स्वतंत्र कंत्राटदारांची निवड करण्यात आली आहे. या माध्यमातून महापालिकेच्या तिजोरीत सुमारे पाच कोटींहून अधिक रक्कम जमा होणार असून यातील ५० टक्के रक्कम कार्यादेश दिल्यानंतर पहिल्या ३० दिवसांमध्ये आणि उर्वरीत ५० टक्के रक्कम पुढील सहा महिन्यांमध्ये महापालिकेला अदा करणे बंधनकारक आहे.

**शहर विभाग**

**कंत्राटदार संस्थेचे नाव** : रझा स्ट्रील.
**एकूण कंत्राट बोली किंमत** : १ कोटी ६० लाख १२ हजार ७८६ रुपये.
**कालावधी** : २४ महिने

पश्चिम उपनगरे.
**कंत्राटदार संस्थेचे नाव** : प्रदीप ट्रेडींग.
**एकूण कंत्राट बोली किंमत** : १ कोटी ५५ लाख रुपये.
**कालावधी** : २४ महिने.

महापालिकेच्या वाहतूक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, भारतातील सर्वात जास्त गाडयांची घनता ही मुंबईत असून ती १९०० गाड्या प्रति किमी इतकी आहे. ही घनता दिल्लीपेक्षा पाच पटीने जास्त आहे. रस्त्यावरील बेवारस वाहनांवर व धातूंचे स्क्रॅप, अनधिकृत बांधकाम साहित्य यावर कारवाई केल्यामुळे वाहतूकीची कोंडी दूर होऊन वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल, तसेच महानगरपालिकेचे रस्ते स्वच्छ होऊन वाहतूकीकरीता बाधा येणार नाही. शिवाय यातून प्राप्त होणारे शुल्क महानगरपालिकेचा महसुल असेल. अनधिकृत बांधकाम साहित्याची विल्हेवाट कंत्राटदारामार्फत लावण्यात येईल. नोटीस कालावधीमध्ये वाहन मालकाने ते बेवारस वाहन रस्त्यावरुन काढणे अपेक्षित आहे.

# 'गृहनिर्माण प्रकल्पाच्या जाहिरातीत प्रकल्पाची माहिती बंधनकारक'

◆ **मुंबई ( प्रतिनिधी) :**

येथून पुढे गृहनिर्माण प्रकल्पांच्या अनुषंगाने केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींसोबत महारेरा नोंदणीक्रमांक, महारेरा संकेतस्थळाचा तपशील आणि क्यूआर कोड संबंधित प्रकल्पाच्या जाहिरातीतील संपर्क क्रमांक आणि पत्ता यामध्ये ज्याचा फॉन्ट मोठा असेल त्या फॉन्टमध्ये छापणे बंधनकारक करण्यात आले आहे. शिवाय हा सर्व तपशील जाहिरातीच्या वरील भागात उजवीकडे रंगीत मजकुरात छापणे अत्यावश्यक आहे. याबाबतचे निर्देश महारेराने एक परिपत्रक काढून नुकतेच जारी केले आहेत. हे निर्देश तातडीने लागू करण्यात आले आहेत.

या आदेशाची अंमलबजावणी करणाऱ्या विकासकांवर ५० हजाराप दंड ठोठावला जाणार आहे. त्यानं १० दिवसांत चुकीची दुरूस्ती करु महारेरा नोंदणीक्रमांक, संकेतस्थळा तपशील आणि क्यूआर कोड विहि आकारात ठळकपणे छापला नाही, त "निर्देशांचा सततचा भंग" गृहीत धरु नियमानुसार यथोचित कारवाई के जाईल, असे महारेरामार्फत सांगण्य आले. महारेरा नोंदणी क्रमांक, महारे संकेतस्थळ, क्यूआर कोड ठळकप छापणे यापूर्वीच अत्यावश्यक करण्य आले आहे. परंतु अनेकदा ह्या बा शोधाव्या लागतात असे महारेराच निर्दशनास आले आहे.

# माणसे गुलामीच्या बेड्यातून मुक्त झाली

जयभीम महोत्सव

## डॉ.प्रकाश सिरसाट यांचे प्रतिपादन






### आज असे होणार कार्यक्रम

बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे शनिवार (दि.१२) रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत भव्य चित्रकला स्पर्धा तर सायंकाळी ६ वाजता धम्मसंगिनी रामगोरख यांचे व्यख्यान होणार आहे.

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: इथल्या समाजाचे प्रश्न, सनातनी व्यवस्थेने निर्माण केलेले आहेत. ही सनातन व्यवस्था टिकून रहावी त्यासाठी त्यांनी अनेक कथित साहित्य लिहून माणसांना गुलाम ठेवण्याचे षडयंत्र केले. मात्र फुले, आंबेडकर यांच्या जन्मामुळे ही व्यवस्था संपुष्टात आली आणि माणूस गुलामीतून मुक्त झाला, एवढे महान कार्य महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.असे परखड मत डॉ.प्रकाश सिरसाट यांनी व्यक्त केले.

बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधित जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने शुक्रवार (दि.११) एप्रिल रोजी व्याख्यान माला आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी डॉ.प्रकाश सिरसाट बोलत होते. व्याख्यान माला कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सतिश साळुंके तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा कृषी अधीकक्ष सुभाष साळवे, प्रा. शशिकांत जावळे, सखाराम उजगरे आदी उपस्थित होते. उपस्थितांना संबोधित करतांना डॉ.प्रकाश सिरसाट म्हणाले की, वेद ईश्वर निर्मित नसून मानव निर्मित आहेत. ही बाब महात्मा ज्योतिबा फुले यांनी ठणकाहून सांगितली.

महात्मा फुलेंच्या एकूण कार्यात, त्यांनी शिक्षणाला अधिक महत्व दिले. खरंतर इथल्या प्रत्येक माणसाने हात्मा फुले यांनी लिहीलेले त्रिरत्न नाटक आवर्जून पहायला हवे. एवढेच नव्हे तर शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रीमुक्तीची चळवळ खऱ्या आर्थने त्याकाळी महात्मा फुले यांनी हाती घेतली. म्हणून सत्यशोधक समाज निटपणे अभ्यासला पाहिजे.असे विचार डॉ.प्रकाश सिरसाट यांनी व्यक्त केले.

या व्याख्यानमालेच्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक ड.भगवान कांडेकर यांनी केले.सूत्रसंचालन प्रा.श्रीराम जाधव तर आभार इंजि.स्वप्निल चोपडे यांनी केले. दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमांना जनतेने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

# देवगांवमध्ये रेणूकादेवीयात्रा

## परंपरा:पालखी मिरवणूकीने यात्रेची सांगता

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज: तालुक्यातील देवगांव येथील रेणुका देवी यात्रेच दरवर्षी प्रमाणे यावर्षीही शनिवार दि.१२ एप्रिल पासुन आयोजन करण्यात आले आहे.देवीचा गाढा ओढणे,सोबत पालखी मिरवणुक कार्यक्रम व रविवारी संध्याकाळी (छबिना) पालखी मिरवणूकीने देवीच्या यात्रेची सांगता होणार असल्याने या यात्रा महोत्सवात मोठ्या संख्येंने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती रेणुका देवी यात्रा कमेटीचे सदस्य आणि गावक-यांनी केली आहे. केज तालुक्यातीलदेवगांवयेथेगावच्या उत्तर दिशेला दोन कि.मी.अंतरावर तिर्थक्षेत्र रेणुका मातादेवीचे सुंदर मंदिर आहे.

गावक-यांचेव पंचक्रोशितील गावांचे ग्रामदैवत असलेल्या या रेणुकादेवीचीयात्रा दरवर्षीचैत्र महीन्यातील पौर्णीमेच्या दिवशी भरली जाते दर वर्षीप्रमाणे या वर्षीही दि.११ एप्रिल शुक्रवार रोजी गावातील सुहासिनीची पंगत देवी मंदीर परिसरत होणार आहे. दि.१२ एप्रिल शनिवार रोजी सकाळी हानुमान जयंती उत्सव साजरा करुन सकाळी आठ वाजतारेणुका देवीचा गाढा व सोबत देवीची पालखीदेवगांव येथून वाजत गाजत मंदीराकडे मार्गस्थ होणार आहे.हा पालखी सोहळा पाहण्यासाठी पंचक्रोशील मंडळी व महीलामोठ्या संख्येने सहभागी व्हावे.दुस-या दिवशी रविवारी दुपारी चार वाजता रेणुका देवी मंदिर परिसरात महाप्रसादाची मोठी पंगत होणार व त्याच दिवशी संध्याकाळी गावातदेवीचा (छबिना) पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. तरी या यात्रा महोत्सवात मोठ्या संख्येंने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती रेणुका देवी यात्रा कमेटीचे सदस्य आणि गावक-यांनी केली आहे.

# कुणी कितीही अडथळे आणा:धोंडे

## ग्वाही:महेश कारखाना लवकरच सुरु होईल



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:कुणी कितीही अडथळे आणले तरी कुटील डावाला भिक न घालता आपण उस उत्पादक शेतक-यांच्या हितासाठी महेश सहकारी साखर कारखाना लवकरच सुरु करणार असून,रतुम्ही चालत राहा.. पाठींबा मिळेल... या भावनेतुन समाजकारण व राजकारण सुरूच ठेवणार असल्याचे प्रतिपादन माजी आ.भीमराव धोंडे यांनी सांगीतले.

आष्टी विधानसभा मतदार संघाचे माजी आ.भीमराव धोंडे यांनी भाजप तालुकाध्यक्ष पदासाठी इच्छुक कार्यकर्त्यांची बैठक गुरुवारी दि.१० एप्रिल रोजी झाली. तालुकाध्यक्ष पदाचे इच्छुकांची नावे ना.पंकजाताई मुंडे आणि पक्षाच्या वरीष्ठांकडे सादर करण्यात येणार आहेत. पंकजाताई जे नाव तालुकाध्यक्ष पदासाठी जाहीर करतील ते आपल्याला मान्य असेल असे माजी आ.भीमराव धोंडे यांनी यावेळी सांगितले. निर्भिडपणे रहा, कुणालाही घाबरण्याची गरज नाही, कोण काय करत नसतं, आपणही इथलेच आहोत. असा कानमंत्र उपस्थित कार्यकर्त्यांना दिला. निवडणुका येत असतात, जात असतात आपला पराभव झाला म्हणून खचून जायचं नाही. हार न मानता येणा-या परिस्थितीचा सामना करीत पुन्हा जोमाने सुरुवात करायची, कुणाला घाबरायच पण नाही. निर्भिडपणे रहायचं, अन्याय सहन करायचा नाही. जर का कोणी दम दिला तर त्याचा व्हिडिओ काढायचा सोशल मिडीयावर टाकायचा क्राईम पोलिसच गुन्हा दाखल करुन कारवाई करतात. त्यामुळे कार्यकर्त्यांनी नव्या जोमाने पुन्हा कामाला लागावे. असे आवाहन धोंडे यांनी केले.

### निलंबन रद्द करण्यासाठी पक्षश्रेष्ठींना पत्र

माझ्यासह ॲड, साहेबराव म्हस्के, अजय धोंडे यांचे भाजपाकडून निलंबन करण्यात आले असले तरी हे निलंबन रद्द करण्यासाठी आम्ही भाजपा पक्षश्रेष्ठीकडे पत्र देऊन मागणी केलेली आहे. त्यामुळे हे निलंबन लवकरच रद्द होणार असल्याचे भीमराव म्हणाले.

याप्रसंगी ड, साहेबराव म्हस्के, नियामत बेग, डा.अजय धोंडे, चेअरमन राजेंद्र धोंडे, अशोक साळवे, लालाभाऊ कुमकर, बबनराव औटे, सईद चाऊस, ड.रत्नदीप निकाळजे, संभाजी जगताप, बाबासाहेब आंधळे, रावसाहेब लोखंडे, हरिभाऊ जंजीरे, दादा जगताप, मोहन खेडकर,सदा पाटील, अरुण सायकड, अस्ताक शेख, शाम सांगळे, बजरंग कर्डीले, गौतम सावंत, अभय गर्जे, वाघुले, आण्णासाहेब पान २ वर

# केजला रेल्वे मार्गाशी जोडावे

## मागणी: केज प्रशासनाला दिले निवेदन



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: हे बीड जिल्ह्याचे सर्वात जुने तालुका ठिकाण आहे. केज तालुक्यात पालेभाज्या-फळभाज्या सोबतच आता नवीन वैज्ञानिक शेती प्रयोग करून फळांची व पिकांची निर्मिती केली जात आहे. मात्र आधुनिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी केज तालुक्यात दळण-वळणासाठी अनुकूल असणारी रेल्वेची सेवा उपलब्ध नाही. सध्या केंद्र शासनाने धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या २४०किमी च्या प्रस्तावित रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणाला १४ फेब्रुवारी २०२५ च्या पत्रानव्ये मंजुरी दिली आहे. या अंतर्गत हा मार्ग धाराशिव-कळंब-बीड असा जाणार असेल तर तो धाराशिव-कळंब-केज-बीड असा करावा अशी कळंब व केजच्या जनतेची मागणी आहे. याशिवाय पान २ वर

## अभिवादन ...



बीड: क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करतांना युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, राजू जोगदंड, भगवान कांडेकर, अविनाश जोगदंड, किसन तांगडे, मनोज मस्के, मायाताई मिसळे, प्रभाकर चांदणे, अक्षय कोकाटे, भैय्यासाहेब मस्के आदी.(छाया:प्रकाश वडमारे)

# सह्याद्री प्रतिष्ठाणकडून भिम जन्मोत्सव

## जयंती:लाईट शो, हँगींग डिजे मुख्य आकर्षण

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव: शहरामध्ये सह्याद्री प्रतिष्ठाणच्या वतीने भिम जन्मोत्सवाचे आयोजन दि. १४ एप्रिल २०२५ रोजी सायं. ५.०० वाजता करण्यात आले असुन लाईट शो व हँगींग डिजे मुख्य आकर्षण असणार आहे.



कार्यक्रमाचे उद्घाटन जयसिंह सोळंके यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थांनी भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांची उपस्थिती असणार आहे. सभापती जयदत्त नरवडे, संभाजी शेजुळ, शिवाजी रांजवण, चंद्रकांत शेजुळ, रोहन घाडगे, राहुल लंगडे, विजय शिंदे, पान २ वर

# रिपब्लिकन सेनेकडून अन्नदान

## ऋणानुबंध:अरुण जगतापांच्या प्रकृतीत सुधारण्यासाठी प्रार्थना



पुण्यभूमी प्रतिनिधी

नगर:ज्येष्ठ नेते माजी आमदार अरुण काका जगताप यांची प्रकृती सुधारण्यासाठी शहरात मंदिर मज्जित तसेच बुद्ध विहार यांसह विविध ठिकाणी प्रार्थना करून सुरू आहे त्याच अनुषंगाने रिपब्लिकन सेनेचे सुनील शिंदे यांच्या संकल्पनेतून महात्मा फुले जयंतीचे निमित्ताने आणि माजी आमदार काका जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी शहरातील नालेगाव येथील बालसुधारगृहातील मुलांना अन्नदान वाटप ११ एप्रिल रोजी करण्यात आले

या माध्यमातून काकांची प्रकृती सुधारण्यासाठी त्यांना आशीर्वाद मिळण्यासाठी तसेच समाजामध्ये वेगळा पान २ वर

# माजलगाव शहरात समताज्योत रॅली

## आवाहन: डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव

पुण्यभूमी प्रतिनिधी




बीड:भारतरत्न, संविधान निर्माता, महान समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता ज्योत रॅली चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली माजलगाव पोलीस प्रशासन आणि शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जात आहे.ही रॅली रात्री ११:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून निघून डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, भीमनगर येथे समाप्त होणार आहे. या रॅलीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पान २ वर

उपक्रम

## जयभीम महोत्सवात मान्यवरांचे प्रतिपादन

# प्रत्येकाने एकदातरी रक्तदान करावे

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:रक्तदान सर्वात श्रेष्ठ दान आहे, त्याने रुग्णांचा जीव वाचतो.त्यामुळे प्रसत्येकाने आपल्या आयुष्यात एकदातरी रक्तदान करुन, गरजू रुग्णांचा जीव वाचविण्याकरिता सामाजिक योगदान द्यावे असे विचार रक्तदान शिबीर उपक्रमात मान्यवर व्यक्तींनी व्यक्त केले.बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधित जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने शुक्रवार (दि.११) रोजी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात मान्यवर बोलत होते.या कार्यक्रमाल अध्यक्ष म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत, उदघाटक म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.महेश माने, डॉ.प्रदिप वाघमारे, डॉ.सुनिल गायकवाड, डॉ.हनुमंत पारखे, गौतम चोपडे, प्रदिप रोडे, डॉ.प्रांजल किमगावकर,प्रविण टाकणखार, एस.टी. गायकवाड, प्रा.अशोक गायकवाड आदी उपस्थित होते.

उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित करतांना मान्यवर म्हणाले की, बीड येथील जयभिम महोत्सवात पान २ वर

### आज असे होणार कार्यक्रम

बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे शनिवार (दि.१२) रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत भव्य चित्रकला स्पर्धा तर सायंकाळी ६ वाजता धम्मसंगिनी रामगोरख यांचे व्यख्यान होणार आहे.

# महात्मा ज्योतिबा फुले जयंती



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:उपअधीक्षक भूमीअभिलेख कार्यालय कळंब येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती दिनेश गायके भुकरमापक (छा.ली) , श्रीमती एम एस तेलंग (शिरस्तेदार,), आर.एल शेळके (प.भू), एम पू गिरीश,आर.एस सुरवसे,बी.बी माळी, प्राचार्य सुभाष वाघमारे ,पत्रकार प्रदिप यादव व भूमि अभिलेख कार्यालयातील इतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले .या कार्यक्रमाप्रसंगी दिनेश गायके यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला तेव्हापासून यांच्या कार्याची, विचारांची माहिती सांगितली .ते म्हणाले की ज्योतिबा फुले यांनी आपल्या पत्नीला शिक्षिका करून दिन ,दलीत व समाजातील सर्व धर्माच्या स्त्री-पुरुष यांना शिक्षित करण्याचे ध्येय घेतले, त्यामुळेच आज सर्वत्र स्त्रियांना शिक्षणाचे द्वारे खुली झाली आहेत.व नोकऱ्यांमध्ये महिलांना स्थान मिळाले आहे. पान २ वर